नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १० * अंक ५९ * * मुंबई * रविवार, दिनांक २९ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिति कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

## देशात प्रथमच मोबाइल अॅपद्वारे मतदान

■ **वृत्तसंस्था, पटना, दि. २८ :**
देशात पहिल्यांदाच मोबाइल अॅपद्वारे मतदान होत आहे. बिहारमधील २६ जिल्ह्यांमधील ४२ नगरपालिकांमध्ये पोटनिवडणुका होत आहेत. पायलट प्रोजेक्ट म्हणून सहा नगरपालिकांमध्ये ई-व्होटिंग केले जात आहे.

मतदान केंद्रांवर पोहोचू न शकणाऱ्यांना मतदानाची सोय व्हावी यासाठी हा प्रकल्प करण्यात आला आहे. मतदानासाठी दोन अ?प्स लाँच करण्यात आले आहेत. ही सुविधा मिळविण्यासाठी आगाऊ नोंदणी करावी लागत होती. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ५० हजारांहून अधिक लोकांनी ई-मतदानासाठी नोंदणी केली होती. सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत ई-मतदान झाले.

## थोडक्यात

### भारतासोबत लवकरच मोठा व्यापार करार



■ **वॉशिंग्टनः** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की अमेरिका आणि चीनमध्ये व्यापार करार झाला आहे. व्हाइट हाऊसमध्ये ट्रम्प यांनी दावा केला की लवकरच भारतासोबतही एक मोठा करार होईल. ते म्हणाले, सर्व देश अमेरिकेशी व्यवहार करू इच्छितात, परंतु अमेरिका फक्त निवडक देशांशी व्यापार करार करेल. उर्वरित देशांना २५% किंवा ३५% कर भरावा लागेल. तथापि, ट्रम्प यांनी चीनसोबतच्या व्यापार करारातील तरतुदींबद्दल सविस्तर माहिती दिली नाही.

### खैबर प्रांतात आत्मघातकी हल्ला १३ सैनिक ठार, २९ जखमी

**इस्लामाबाद :** शनिवारी पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एका आत्मघातकी हल्लेखोराने लष्करी ताफ्याला लक्ष्य केले. या हल्ल्यात १३ सैनिक ठार झाले. तर १० सैनिक आणि १९ नागरिक जखमी झाले. वृत्तसंस्था एएफपीच्या वृत्तानुसार, हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेल्या वाहनाची लष्करी ताफ्याला धडक दिली.
खैबर पख्तूनख्वा येथे तैनात असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याने एएफपीला सांगितले की, स्फोट इतका शक्तिशाली होता की दोन घरांच्या छतांवर पडून सहा मुले जखमी झाली. या बॉम्बस्फोटाची जबाबदारी पाकिस्तान-तालिबान (टीटीपी) शी संबंधित हाफिज गुल बहादूर गटाने घेतली आहे. खैबर प्रांत हा टीटीपीचा बालेकिल्ला मानला जातो.

### इराणी अधिकाऱ्यांचे अंत्यसंस्कार

**तेहरान :** इस्त्रायलशी १२ दिवसांच्या युद्धात मारल्या गेलेल्या ६० इराणी अधिकाऱ्यांचे अंत्यसंस्कार शनिवारी करण्यात आले. यामध्ये ३० लष्करी कमांडर आणि ११ अणुशास्त्रज्ञांचा समावेश आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी तेहरानमध्ये हजारो लोक जमले होते.
अधिकाऱ्यांचे मृतदेह वाहनांवर इराणी ध्वजांनी गुंडाळलेल्या शवपेट्यांमध्ये ठेवण्यात आले होते. शवपेट्यांसोबत अधिकाऱ्यांचे फोटोही ठेवण्यात आले. यावेळी इस्त्राईलाचा निषेध केला गेला.

# हिंदीच्या विरोधामागे राजकारण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :**
पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे.

ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी



जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

**परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला.

हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही? असा प्रश्न त्यांनी केला.

## प्रधानमंत्री मोदींनी साधला अंतराळवीर शुभांशू शुक्लाशी संवाद



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ॲक्सियम मिशन ४ वर असलेले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. पंतप्रधान कार्यालयाने ५.४९ वाजता या संभाषणाचा व्हिडिओ प्रसिद्ध केला. दोघांमध्ये १८.२५ सेकंद संभाषण झाले.

पंतप्रधान मोदींनी शुभांशू शुक्ला यांना विचारले की, तुम्ही गाजर हलवा घेऊन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेले आहात. तुम्ही तुमच्या मित्रांना जेवू घातले का? यावर शुभांशू यांनी सांगितले की हो, मी माज्या मित्रांसोबत बसून जेवलो. शुभांशू यांनी पंतप्रधान मोदींना सांगितले - अंतराळातून भारत खूप भव्य दिसतो. आपण एका दिवसात १६ सूर्योदय आणि १६ सूर्यास्त पाहतो.

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू दोन दिवसांपूर्वी २६ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले. ४१ वर्षांनंतर अंतराळात जाणारे ते पहिले भारतीय आहेत. २५ जून रोजी दुपारी १२ वाजता ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत ते सर्व अंतराळवीरांसह आयएसएसला रवाना झाले.

**पंतप्रधान मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ब्रिक्स देशांच्या दौऱ्यावर आहेत. ते आफ्रिकेतही जातील. मोदी २ ते ९ जुलै दरम्यान घाना, त्रिनिदाद, टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामीबिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत. आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांसोबत भारताचे दृढसंबंध आहेत. मोदींच्या या दौऱ्याने ते वृद्धींगत होतील. या दौऱ्यादरम्यान ते ब्राझील येथे १७ व्या ब्रिक्स शिखर संमेलनात सहभागी होतील.

पंतप्रधान मोदी २ जुलै रोजी पहिल्यांदा घाना या देशाला भेट देतील. गेल्या तीन दशकात पहिल्यांदा एखादा भारतीय पंतप्रधान या देशाच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते राष्ट्रपती नाना अकुफो-आडो यांची भेट घेतील. आर्थिक, ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रात भागीदारीविषयी दोन्ही देशात चर्चा होईल. या देशाशी व्यापारी करारामुळे ईकोवास आणि आफ्रिकी संघाशी भारताचे नाते मजबूत होण्याची शक्यता आहे.

## शिवसेना टोमणे सम्राटांची नाही



■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २८ :**
सोन्याचा चम्मच तोंडात घेऊन मी जन्माला आलो नसलो, तरी मी जनतेला सोन्याचे दिवस दाखविले आहे. शिवसेना हा मालक-नोकरांचा पक्ष नाही, तर सच्चा शिवसैनिकांचा व कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. ही शिवसेना हिंदूहृदय सम्राटांची आहे, टोमणे सम्राटांची नाही, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.

ते भंडारा येथे बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार सभा भंडारा येथे रेल्वे मैदानात पार पडली. शिंदे पुढे म्हणाले, मी सीएम असताना म्हणत होतो की, मी कॉमन मॅन आहे. आता मी डीसीएम आहे. म्हणजेच डेडिकेटेड कॉमन मॅन. वाघाचे कातडे पांघरून वाघ होता येत नाही. घरी बसणाऱ्यांना जनतेने घरीच बसवले आहे. कॉमन मॅन बनण्यासाठी बाळासाहेब ठाकरेंचेच विचार लागतात. ज्याने बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांना त्याची प्रचिती आली आहे.

यावेळी व्यासपीठीवर राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार मनिषा कायंदे, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी आमदार कोरोटे, माजी आमदार चंद्रिकापूरे, संजय कुंभलकर, डॉ. अश्विनी भोंडेकर, पद्माकर बावणकरसह शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

भगवा म्हणजे एक विचार आहे, भगवा म्हणजे झंझावात, भगवा म्हणजे तलवारीची धार आहे, भगवा म्हणजे जिजाऊचा आशीर्वाद आहे, हे लक्षात ठेवा. विधानसभेत जसा भगवा फडकवला तसाच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भगवा फडकवण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केले.

या कार्यक्रमादरम्यान, जिल्ह्यातील भाजपा आणि इतर पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

## भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांची नियुक्ती होणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**



भारतीय जनता पक्षाला लवकरच नवीन प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जागी आता प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे.

त्यासाठी रवींद्र चव्हाण हे ३० जून रोजी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यानंतर एक जुलै रोजी त्यांची नियुक्ती जाहीर केली जाणार आहे. वरळी डोम येथे एक जुलै रोजी सकाळी ११ 1 वाजता यासंबंधीची अधिकृत घोषणा होणार असून यावेळी भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी महाराष्ट्र, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आदी राज्यातील प्रदेशाध्यक्ष निवडीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यासाठी दोन केंद्रीय मंत्री आणि एका माजी केंद्रीय मंत्र्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. महाराष्ट्राची जबाबदारी किरेन रिजिजू यांच्यावर सोपवण्यात आली आहे.




## शेतीच्या बांधावरून दोघांचा खून

**विष प्राशन करून आरोपीची आत्महत्या**

■ **महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. २८ :**
शेतीच्या बांधाच्या वादावरून ३ जणांचा बळी गेल्याची भयंकर घटना वर्धा जिल्ह्यातील निमसडा गावात घडली आहे. या प्रकरणात आरोपीने प्रथम आपली काकू व चुलत भावाची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली. त्यानंतर स्वतःही विष प्राशन करून मृत्यूला जवळ केले. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.

आत्महत्या करणाऱ्या आरोपीचे नाव महेंद्र मोहिजे असे होते. त्याने साधना सुभाष मोहिजे (५५) व त्यांचा मुलगा नितीन सुभाष मोहिजे (२७) या दोघांची कुऱ्हाडीने हत्या केली. या तिघांमध्ये गत काही दिवसांपासून शेतीच्या धुऱ्याच्या वाटपावरून वाद सुरू होता. गावातील काही जमिनी ठेक्याने लावण्यावरूनही त्यांच्यातील तणाव वाढला होता. शुक्रवारी सकाळी हा वाद एवढा टोकाला गेला की, महेंद्र मोहिजेने संतापाच्या भरात नितीनी व त्याची आईवर कुऱ्हाडीने हल्ला करून त्यांना जागीच ठार केले. त्यानंतर स्वतःही विष प्राशन केले. त्यानंतर काही वेळातच त्याचाही मृत्यू झाला.


या घटनेची माहिती मिळताच अल्लीपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव गेतली. पोलिस अधीक्षक अनुराग जैन व अतिरिक्त पोलिस अधीक्षक राहुल चौहन हे ही तातडीने निमसडा येथे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संपूर्ण स्थितीचा आढावा घेतला.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वर्धा जिल्हा रुग्णालयात पाठवले. पोलिसांनी हे हत्याकांड शेतीचा मालकीहक्क व उत्पन्नाच्या वाटणीवरून झाल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी पोलिस मृतांचे शेजारी व नातेवाईकांचे जबाब नोंदवून घेत आहेत.

दुसरीकडे, बुलढाणा जिल्ह्यातही एका तरुणाने आपल्या दोन मित्रांच्या मदतीने सख्खा भाऊ व त्याच्या पत्नीवर प्राणघातक हल्ला केला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी बुद्रुक येथे ही घटना घडली आहे.

## काटा लगा' फेम शेफालीचा संशयास्पद स्थितीत मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**



काटा लगा गाण्यातील प्रसिद्ध मॉडेल आणि अभिनेत्री शेफाली जरीवालाचा मृत्यू अत्यंत संशयास्पद परिस्थितीत झाला आहे. रात्री ती अंधेरीतील आपल्या अपार्टमेंटमध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. तातडीने रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं.

शेफाली आपल्या तरुण आणि सुंदर दिसण्यासाठी डोस घेत होती, अशी माहिती समोर आली आहे. अंधेरीतील एका प्रसिद्ध डॉक्टरच्या सल्ल्याने गेल्या ६-७ वर्षांपासून ती हे उपचार घेत होती. त्वचा गोरी, नितळ दिसण्यासाठी हे डोस घेतले जातात, असे डॉक्टरांनी सांगितले.
विशेष म्हणजे, या डॉक्टरांनी सांगितले की, शेफाली अत्यंत फिट होती. तिच्याकडून कधीही आजाराची तक्रार झाली नव्हती. मात्र, हे औषध शरीरावर काय परिणाम करू शकते, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## भारत एकसंध राहण्यात राज्यघटनेचे मोठे योगदान

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :**
भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश या देशांची परिस्थिती आपण बघत आहोत. दुसरीकडे, भारतावर जेव्हा जेव्हा संकट आले तेव्हा भारत एकसंध राहिला आहे. यात भारतीय राज्यघटनेचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले . राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथे उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या संविधान प्रास्ताविका पार्कचे लोकार्पण सरन्यायधीशांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, भारतीय संसदेने अनुच्छेद ३७० रद्द केल्यावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. भारत हा संघराज्य आहे. अमेरिकेसारखी राज्यांसाठी वेगळी राज्यघटना हा विचार डॉ.आंबेडकरांना मान्य नव्हता. देशाला एकसंध ठेवण्यासाठी देशाची एकच राज्यघटना हवी,




असे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते. याच कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवल्याचा खुलासा तत्कालीन खंडपीठात असलेल्या न्या.गवईंनी केला.

भारतीय संविधानातील अनुच्छेद ३७० हे जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे महत्त्वाचे कलम होते. या कलमानुसार जम्मू-काश्मीरला स्वतःचे संविधान लाभले होते आणि भारताच्या संसदेला केवळ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि संप्रेषण या विषयांवरच तिथे कायदे करता येत होते. ५ ऑगस्ट २०१९ रोजी भारत सरकारने राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे अनुच्छेद ३७० हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

या निर्णयामुळे जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द झाला आणि त्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये झ जम्मू-काश्मीर आणि लडाख असे विभाजन करण्यात आले. अनुच्छेद ३७० हटवण्याच्या निर्णयाविरोधात अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. यामध्ये याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, केंद्र सरकारने राज्य सरकारच्या संमतीशिवाय हा निर्णय घेतला, जो संविधानाच्या संघराज्यात्मक रचनेच्या विरोधात आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने एकमताने निर्णय दिला की, अनुच्छेद ३७० तात्पुरता होता आणि राष्ट्रपतींना तो रद्द करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

# खारघरमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबीर

## पनवेल म.न.पा. व अ.भा. मराठी नाट्य परिषद पनवेल चा संयुक्त सांस्कृतिक उपक्रम



**पनवेल |** पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवसांचे मोफत अभिनय प्रशिक्षण शिबीर, खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे 30 जून पासून या शिबिराची सुरुवात होणार आहे. या शिबिरामध्ये नाट्य व सिनेक्षेत्रातील दिग्गज मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. पनवेल महापालिकाक्षेत्रामधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळावे याकरिता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महानगरपालिकेमार्फत पुढाकार घेऊन आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.

शिबिराच्या वेळ

अभिनय शिबिराला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादामुळे सकाळी 9 ते 12 दुपारी 1ते 4 आणि सायंकाळी 5 ते 8 अशा तीन सत्रात शिबिर होणार आहे. दोन गटात हे अभिनय शिबीर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे 8 ते 16 व दुसरा गट 16 ते 60 वया पर्यंत आहे. सकाळी व संध्याकाळी अशा दोन टप्प्यात आठ दिवस हे अभिनय शिबीर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये 30 /30 प्रशिक्षणार्थी आहेत.

या अभिनय शिबीराचा समारोप सात जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. सर्व शिबीरांर्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**संपर्क**

शिबीरात सहभागी होण्यासाठी संबंधितांनी पुढील क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा.

1.शामनाथ पुंडे- प्रमुख कार्यवाह- नाट्य परिषद पनवेल शाखा.

मो.नं : 9821758147

2.सौ स्मिता गांधी*

मो.नं. 9323489693

3.सौ. वर्षा कुलकर्णी जनसंपर्क अधिकारी पनवेल महानगरपालिका.

मो.नं. 7715815127

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून नाट्य कलावंत दिग्दर्शक अशोक केंद्रे (मुंबई), मूक अभिनय अभ्यासक संकेत खेडकर (अहिल्यानगर ), प्रा. रवी धुताडमल (रिपर्टरी थिएटर -एनएसडी)

प्रा. डॉ. संजय पाटील, ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक कलावंत धनंजय सरदेशपांडे( पुणे), निर्माता, दिग्दर्शक व कलावंत राजेश पाठक ( कल्याण) आदी तसेच इतरही दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन या शिबीरात होणार आहे. शेवटच्या दिवशी सर्व सहभागी शिबीरार्थींचे सादरीकरण होणार.

# खा. सुनील तटकरे यांचा श्रीवर्धन दौरा!



**श्रीवर्धन कोलमांडले |** दि २७ जून २५ रोजी तालुक्यामध्ये खासदार सुनील तटकरे यांचा दौरा पार पडला. यानिमित्ताने तालुक्यातील विविध कामांचे भूमिपूजन, उद्घाटन तसेच आढावा बैठक आयोजित करण्यात आले होते. या रोजी सकाळी साडे अकरा वाजता बागमांडला येथे बागमांडला ते आंबेत टोल-वीर रोड राज्य महामार्ग क्र. १०० वरील किमी ०/००० ते ३०/००० दरम्यान पूल, मोऱ्या आणि रस्ता काँक्रिटीकरण भूमिपूजन करण्यात आले. तसेच भोस्ते येथे राष्ट्रीय महामार्ग ९९ वरील श्रीवर्धन लोणेरे रस्त्याच्या (कि. मी. ०/०० ते ४९/८००) कामाचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा, भोस्ते, श्रीवर्धन येथे युगंधर प्रतिष्ठान अध्यक्ष संतोष सापते यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप खासदार तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते करण्यात आले.

श्रीवर्धन शहरात होत असलेले क्षत्रिय मराठा समाज संस्थेच्या समाजगृह बांधकामाची पाहणी करण्यात आली. यानंतर श्रीवर्धन येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवनात तालुक्यातील विविध विकास कामांच्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. तसेच दिवेआगर येथील समुद्र किनाऱ्यावर जोड रस्ते मजबुतीकरण आणि वाहनतळ कामाचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आले.

या सर्व कार्यक्रमावेळी मा. आ. तुकाराम सुर्वे, तसेच सुभाष केकाणे, समीर बनकर, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, सुजित तांदळेकर, अमित खोत, महादेव पाटील, बबन मनवे, संजय कर्णिक, हिदायत कुद्रते, शब्बीर पिरपिरे, नाना सावंत आणि इतर पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिव ऊर्जा मित्र मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**रोहा |** तालुक्यातील शिव ऊर्जा मित्र मंडळ रोहा मधील सामाजिक कार्यकर्ते आणि कवी गायक भजन सम्राट माननीय श्री अरुण देशमुख साहेब यांच्या वतीने द.ग.तटकरे माध्यमिक विद्यालय विरजोली शाळेमध्ये छोटया खानी कार्यक्रमात इयत्ता दहावी मार्च 2025 मध्ये विद्यालयामधून मुलींमधून प्रथम क्रमांक कुमारी संचिता चिंतन बैकर 87.60% विरजोली तसेच मुलांमधून प्रथम क्रमांक कुमार मंगलदीप जनार्दन मोहिते राहणार कांडणे बुद्रुक 76.40% या विद्यार्थ्यांचा पुष्प गुच्छ व भेट वस्तू देऊन जाहीर सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या कार्यक्रमासाठी मा. श्री.सुरेश मोरे सर जेष्ठ नागरिक सचिव तसेच मा.श्री. नाना भाई दळवी साहेब अध्यक्ष शिव ऊर्जा मंडळ अध्यक्ष, मा. श्री समीर दळवी , मा. श्री प्रकाश पवार, मा. श्री नथुराम भोसले, मा. श्री सचिन रटाटे, मा. श्री अरुण देशमुख साहेब, मा. श्री संगम सर, मा. श्री राजेंद्र कुंडे साहेब शाळा समिती सदस्य विरजोली हायस्कूल, मा.श्री दीपक सुखदरे साहेब सचिव मुंबईकर ग्रामस्थ मंडळ भालगाव, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री मार्गेसर, सर्व सहकारी शिक्षक श्री पाटील सर श्री अडसूळ सर श्री देवळेकर सर श्री घाग सर हजर होते.

# युवराज मुंढे यांच्या नेतृत्वाखाली गोरेगाव विभागात भाजपचे पक्षप्रवेश

**माणगाव |** तालुक्यातील गोरेगाव विभागात- आगामी महत्त्वाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने गोरेगाव विभागात आपल्या पक्षाचा विस्तार करत मोठे पाऊल उचलले आहे. मनसे मधून अनेक महत्वाचे कार्यकर्ते आणि युवा नेते भारतीय जनता पक्षात प्रवेश करताना दिसून आले, तसेच त्यांना नियुक्ती पत्रे देऊन नव्या जबाबदाऱ्या दिल्या गेल्या. या प्रसंगी जिल्हा भाजपा सरचिटणीस बिपीनदादा महामुणकर,जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब महाले,माणगाव तालुका अध्यक्ष व युवा नेतृत्व युवराज मुंढे यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात मनसेतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गोरेगाव विभाग प्रमुख अमोल पवार यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. तसेच माणगाव तालुका पदाधिकारी म्हणून निलेश राशीनकर सरचिटणीस, अशोक यादव उपाध्यक्ष, रोशनी जाधव उपाध्यक्ष, राजीव परांजपे चिटणीस, मारुती कासरेकर चिटणीस, मंदार महामुणकर युवा मोर्चा तालुकाध्यक्ष, अमोल पवार युवा मोर्चा उपाध्यक्ष, प्रियांका मेहता महिला मोर्चा अध्यक्षा, युवा मोर्चा शहर अध्यक्ष यश मोने,अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शहानवाज खाचे, अपंग सेल तालुकाध्यक्ष मुकेश शिंदे, आदित्य मोरे युवा मोर्चा सरचिटणीस, साहिल चिनके युवा मोर्चा कोषाध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे.

# वरदाइ चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे माऊंट कार्मेल हायस्कूल येथील विद्यार्थिनींना सायकलीचे मोफत वाटप



**मुरुड जंजिरा |** वरदाइ चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे खासदार सुनीलजी तटकरे,महिला व बालकल्याण सभापती अदिती तटकरे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून समाजातील गरीब शालेय विद्यार्थिनीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे माउंट कार्मेल हायस्कूल कोर्लई येथील ५३ शालेय विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे,रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन,अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे उपाध्यक्ष व माजी सभापती स्मिता खेडेकर,मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ,भोईघर ग्रामपंचायत सरपंच हर्षल महाडिक,मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार शमीचे संचालक अजित कासार ,माजी सभापती बाबू नागवेकर,नाना गुरव,वासंती उमरोटकर,भरत म्हात्रे,कोर्लई हायस्कूल चे चेअरमन फादर बोनाव्हेंचर नुनीस, मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी,माजी सभापती आशिका ठाकूर,संजय महाडिक,दिनेश बापलेकर, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सचिन पाटील, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माऊंट कार्मेल हायस्कूल चे चेअरमन फादर बोनाव्हेंचर नुनीस यांनी सांगितले कि,रायगडचे खासदार लोकांचे प्रश्न झटपट सोडवून लोकांना न्याय मिळवून देणारे आहेत. विकास कामांबरोरच लोकांचे प्रश्न सोडवून लोकांना दिलासा देणारा लोकप्रतिनिधी कधी हि लोकप्रिय असतोच.

# कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था तर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**उरण |** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेल्या कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी विविध शाळांना, शैक्षणिक संस्थांना, महाविद्यालयांना मोठया प्रमाणात शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सामाजिक बांधिलकी जपत कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील इयत्ता ५ वी ते १० वी त शिकत असलेल्या प्राथमिक शाळेत तसेच ११ वी व १२वीत शिकणाऱ्या फुंडे महाविद्यालयात एकूण ३००० हुन अधिक वह्यांचे वाटप करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर फुंडे प्राथमिक शाळेच्या सभागृहात वह्या वाटपचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर,सरपंच कुणाल अरुण पाटील, शिवसेना नेते कमळाकर पाटील,फुंडे हायस्कुल चेअरमन कृष्णाजी कडू,फुंडे हायस्कुलचे प्राचार्य साळुंखे बी. बी, शिक्षक प्रविण, उपशाखाप्रमुख महेश पाटील ,विनय पाटील,हृषिकेश म्हात्रे,अमित पाटील जोतेश तांडेल,रोशन म्हात्रे,सुरेंद्र पाटील,प्रथम तांडेल,प्रणय पाटील यांच्यासह शाळेच्या पर्यवेक्षिका बाबर एस. एम, पाटील एस. एस, शिक्षक पाटील एच. एन, शिक्षक पाटील.डी. डी,शिक्षक म्हात्रे ए. आर,उपशिक्षिका पाटील एस. व्ही तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक एच एन पाटील यांनी केले तर प्रस्तावना साळुंके बी बी यांनी केले. प्रस्तावनेत प्राचार्य साळुंके यांनी कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर करून चांगले शिक्षण घेऊन प्रगती करण्याचा सल्ला दिला.तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी पूर्वीचे शिक्षण कशा पद्धतीचे होते शिक्षण व्यवस्था कशी होती हे सांगितले. हे सांगत असतानाच कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था ही दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करते. गोर गरीब मुलांना आधार देते. गोर गरीब मुलांचे शिक्षण कुठेही अडू नये. विद्यार्थ्यांनी चांगली प्रगती करावी हा दृष्टीकोण ठेऊन शैक्षणिक साहित्य वाटपचा हा कार्यक्रम खूपच स्तुत्य आहे. अशा शब्दात त्यांनी सरपंच कुणाल पाटील व संस्थेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचे कौतुक केले.जर हुशार व गुणवंत विद्यार्थी असेल व त्याची घरची परिस्थिती खराब असेल तर त्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी येऊन मला भेटावे त्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा खर्च मी स्वतः करेन. असेही आश्वासन माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी उपस्थितांना दिले. शेवटी कार्यक्रमाचे आभार मानून सांगता झाली. शैक्षणिक साहित्य वाटप केल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता. विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

# वावे धबधबा ओसंडून वाहू लागला.

## फेसाळयुक्त पाण्याचा वावे धबधबा बनतोय पर्यटकांचे आकर्षण



**तळा |** तळा तालुका डोंगराळ निसर्ग सौंदर्याने नटलेला असल्याने पावसाळी धबधबे पर्यटकांना आकर्षित करत असतात.मुंबई गोवा महामार्गावर इंदापूर पासून पश्चिमेला तळा शहराकडे येताना १२ की. मी. ला डाव्या बाजूला वावे धबधबा लागतो.यावर्षी पावसाने मे महिन्यापासूनच मुसळधार कोसळून तळा तालुक्याला झोडपले त्यामुळे तालुक्यातील नदया, तलाव,विहिरी तसेच धबधबे तुडुंब भरून वाहत आसून वावे येथील फेसाळयुक्त पाण्याचा धबधबा पर्यटकांना खुणावू लागला आहे.जोरदार पावसामुळे वावे धबधबा पांढऱ्याशुभ्र फेसाळयुक्त रंगात धो धो वाहत आहे.धबधब्याच्या आजूबाजूला हिरवेगार मनमोहक निसर्गाने हिरवी शाल पांघरलेली दृश्य पहायला मिळते.पक्ष्यांच्या वेगवेगळ्या स्वरांचा किलबिलाट, बहरलेली वृक्षवल्ली, धबधब्यातील पाण्याचा खळखळाट आवाज यामुळे पर्यटक देहभान हरपून आनंद लुटतात.सुरक्षेच्या दृष्टीने धबधबा उत्तम असल्याने मुंबई, पुण्यापासून पर्यटक या धबधब्याला भेट देतात. या धबधब्यावर कोणत्याही प्रकारचा धोका नसल्याने अनेक पालक आपल्या पाल्ल्यांसह भिजण्याचा आनंद घेण्यासाठी येत असतात.तळा शहरापासून जवळच असल्याने तरुणाईचं या धबधब्याकडे विशेष आकर्षण आहे.फेसाळलेल्या पाण्यात मनसोक्त भिजण्यासाठी तरुणाई या धबधब्याकडे वळली जाते.मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे हा धबधबा वेगाने वाहू लागला असून शनिवार, रविवारी सुट्टी असल्याने या ठिकाणी पर्यटकांची प्रचंड गर्दी पहावयास मिळणार आहे. जवळच वावे गाव असल्याने पर्यटकांना चुलीवरच्या भाकऱ्या, शाकाहारी, मांसाहारी जेवण ऑर्डर दिल्यास बनवून मिळते. यामुळे वावे येथील धबधबा पर्यटकांचं आकर्षण बनत आहे.

# परळी बाजारपेठेत वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर; वाहतूक पोलीस तैनातीची मागणी



**सुधागड |** पाली–खोपोली मुख्य मार्गावरील परळी बाजारपेठ ही सुधागड तालुक्यातील एक महत्त्वपूर्ण व्यापारी केंद्र बनली आहे. पंचक्रोशीतील नागरिक दररोज खरेदीसाठी या ठिकाणी मोठ्या संख्येने येत असतात. यामुळे परळीत दिवसागणिक वाहनांची वर्दळ वाढत असून, त्याचा थेट परिणाम वाहतूक कोंडीवर होत आहे.

बाजारपेठेच्या रस्त्यांवर नागरिकांची खासगी वाहने, दुचाकी बेधडकपणे रस्त्यावरच उभी केली जातात. त्यामुळं वाहनांची ये–जा अडते, वाहने रांग लावून थांबतात आणि बाजारपेठ परिसर सतत गोंधळात सापडतो. शनिवारी आठवड्याच्या बाजारदिवशी ही समस्या अधिक गंभीर होते.

या कोंडीमुळे स्थानिक व्यापारी, शालेय वाहने आणि रुग्णवाहिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळा रस्त्यावर वादावादी किरकोळ अपघातांच्या घटना घडत असतात.

या पार्श्वभूमीवर परळी बाजारपेठेत वाहतूक पोलीस तैनात करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. स्थानिक नागरिक, समाजिक कार्यकर्त्यांनीही प्रशासनानेकडे हि मागणी होत आहे. "या भागातील वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी किमान वाहतूक पोलीस आणि योग्य वाहतूक नियोजनाची गरज आहे. अन्यथा वाहतूक कोंडी टळणार नाहीत,"असे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

प्रशासनाने या मागणीची गंभीर दखल घ्यावी आणि परळीतील वाहतुकीला गती व सुरक्षितता मिळावी, हीच नागरिकांकडून एकमुखी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मोदिजींच्या मन की बात द्वारे थेट संवाद करंजाडे वाशीयाशी



**पनवेल |** माननीय नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यापासून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी देशवासियांना उद्देशून "मन की बात" मधुन संवाद साधतात. या कार्यक्रमाचे कौतुक संपूर्ण जगभर होते आहे. तसेच ११ वर्षे राष्ट्र सेवेची, समर्पणाची, सुशासनाची मा. पंतप्रधान मोदिजींच्या 'मन की बात' द्वारे थेट संवाद रविवार दिनांक २९ जून रोजी सकाळी ११ वाजता भारतीयांशी साधणार आहेत. त्या निमित्ताने मन की बात या कार्यक्रमाचे ११ ठिकाणी थेट प्रसारण करंजाडे वासियांसाठी करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाजप युवा नेते रामेश्वर आंग्रे यांनी आयोजित केले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष भाजप नेते जे.एम म्हात्रे, माजी विरोधीपक्षनेते भाजप नेते प्रितम म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक गणेश कडू यांच्या मार्गदर्शनाखाली करंजाडे वसाहतीत अकरा ठिकाणी मन की बात या कार्यक्रमाचे जाहीर प्रसारण करण्यात येणार आहे. त्यामुळे करंजाडे वसाहतीतील सर्व नागरिकांनी या मन की बात कार्यक्रमाच्या प्रसारणात सहभागी व्हावे असे आवाहन भाजप माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केले आहे.

# महाळुंगी आदीवासी वाडीतील शेकाप पदाधिकारी आणि कार्यकर्ते भाजपात





**पनवेल |** भारतीय जनता पार्टीच्याा माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना तसेच सक्षम नेतृत्वावर प्रभावीत होऊन महाळुंगी आदीवासी वाडीतील शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वगात करुन त्यांनी जो विश्वास ठेऊन पक्ष प्रवेश केला आहे तो सार्थ ठरेल असा विश्वास दिला.

पनवेल विधानसभा मतदार संघातील महाळुंगी आदीवासीवाडीतील शेकापचे राम नाईक, लुहु वाघे, वाळु वाघे, राजेश वाघे, नरेश नाईक, राकेश नाईक, विनोद वाघे, सुनिता वाघे, अंजना वाघे, प्रकाश वाघे, लक्ष्मी वाघे, नितेश वाघे, सुनिता वाघे, महेश वाघे, शारदा वाघे, द्रुपदा वाघे, शुभांगी वाघे, सुमन वाघे, कविता वाघे, मुक्ता नाईक, चंद्रा नाईक, शानुबाई गोंधळी, राजेश वाघे, हितेश नाईक, ज्ञानेश्वर नाईक यांनी भाजपचे कमळ हाती घेतले. हा पक्ष प्रवेश सोहळा पनवेल शहरातील भाजपच्या कार्यालयात संपन्न झाला.

यावेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, प्रमोद भगत, द्वाराकानाथ बोलाडे, रघुनाथ पाटील, शशिकांत दिसले, सरपंच चंदाताई वारदे, योगेश पाटील, सचिन दिसले, प्रशांत बोलाडे, आत्माराम पाटील, उमेश वारदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे.

# आखाती संघर्ष आणि जागतिक झळ

हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार



इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द आजघडीला शांत दिसत असले तरी नजिकच्या भविष्यकाळात पुन्हा पेटणार नाही, याची खात्री आज कोणीच देताना दिसत नाही. हे युध्द त्या दोन देशांमध्ये झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे. मध्य पूर्व हा जगातील तेल उत्पादनाचा एक प्रमुख भाग आहे. जगातील सुमारे २५ टक्के तेल व्यापार इराण आणि होम ुझच्या आखातासारख्या त्याच्या आसपासच्या भागातून होतो. इस्रायल आणि इराणमधील युद्ध पुढे पुन्हा भडकले, तर तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो. शिपिंग मार्ग बंद होऊ शकतात आणि तेल टँकरवर हल्ल्याचा धोका वाढू शकतो. यामुळे तेलाच्या किमती गगनाला भिडू शकतात. गेल्या काही दिवसांमध्ये तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रति पिंप ७८ डॉलर्सवर पोहोचल्या. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढू शकतात. परिणामी, सामान्य लोकांचा खर्च वाढेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईदेखील वाढेल. तेलाचा वापर केवळ वाहनांसाठी नाही, तर वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीदेखील केला जातो. कच्चे तेल महाग झाल्यास वाहतुकीचा खर्च वाढेल. त्यामुळे अन्नपदार्थ आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर भार वाढेल. दोन्ही देशांमधील युद्धापूर्वी, महागाई नियंत्रणात असल्याचे दिसून येत होते आणि यामुळेच अलिकडच्या काळात अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांच्या मध्यवर्ती बँका त्यांच्या देशांमधील बँकांना दिलेल्या कर्जावरील व्याजदर कमी करत होत्या. 'बँक ऑफ इंग्लंड'ने अलीकडेच ब्रिटनचा बेस इंटरेस्ट रेट ४.२५ टक्के केला. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही अलिकडेच प्रमुख रेपो रेट ५० बेसिस पॉइंट्सने कमी केला. तथापि, ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'मुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने दर कपात कमी न करता 'जैसे थे' ठेवले आहेत.

आज अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे थांबलेले इराण-इस्रायल युद्ध भविष्यात पुन्हा अनुभवायला मिळू शकते. त



नेहमीच जागतिक व्यापारात अडथळा आणू शकते. होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील तेल व्यापाराचा एक प्रमुख मार्ग आहे. दोन्ही देशांमधील तणावामुळे हा मार्ग बंद झाल्यास जहाजांना लांब मार्गाने जावे लागू शकते. यामुळे वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च वाढेल आणि विम्याच्या किमतीही वाढू शकतात. तेल आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. भारतातून कापड, तांदूळ आणि मसाल्यासारख्या वस्तूंच्या निर्यातीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. दोन्ही देशांमधील युद्धाच्या बातमीने अलिकडच्या काळात शेअर बाजारातही खळबळ उडाली. काही तज्ज्ञांच्या मते भीतीपोटी गुंतवणूकदार सोने किंवा चांदीसारख्या सुरक्षित ठिकाणी आपले पैसे गुंतवत आहेत. सोन्याची किंमत वाढली आहे. डॉलर मजबूत झाला आहे. त्यामुळे शेअर बाजारात घसरण दिसून येत आहे. तथापि, या तणावाचा काही बाजारपेठांवर अद्याप फारसा परिणाम झालेला नाही. भारतातील सेन्सेक्स आणि निफ्टी सारख्या भांडवली बाजारावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दबाव दिसतो आहे. युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होतो. जागतिक पुरवठा साखळी बंद पडल्याने इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि औषधे यासारख्या उद्योगांचे नुकसान होऊ शकते. यामुळे कारखाने बंद होऊ शकतात आणि बेरोजगारी वाढू शकते.

अलिकडच्या काळात अनेक विमान कंपन्यांनी मध्य पूर्वेतील उड्डाणे स्थगित किंवा रद्द केली तर काही देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले. मध्य पूर्वेतील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या एमिरेट्सने सांगितले की त्यांनी इराक, जॉर्डन, लेबनॉन आणि इराणला जाणारी आणि जाणारी उड्डाणे ३० जूनपर्यंत स्थगित केली. एतिहाद एअरवेज-ने अबू धाबी आणि तेल अवीव दरम्यानची उड्डाणे रद्द केली. कतार एअरवेजने इराण, इराक आणि सीरियाला जाणारी उड्डाणे तात्पुरती रद्द केली. मध्यपूर्वेत पुन्हा एकदा भडका उडाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत ताबडतोब दहा टक्क्यांनी वाढ झाली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर ६२ डॉलर प्रति बॅरल इतक्या खाली घसरले होते. परंतु यात वाढ होत दर ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. त्याचप्रम



णे लगेच शेअर बाजारातही घसरण झाली. अर्थात जागतिक अस्थिरता निर्माण झाल्यामुळे सोने दहा ग्रॅमला एक लाख रुपयांवर गेले. बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे येतात आणि शेअर बाजार कोसळतो, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. या वेळी असेच घडले. इस्रायलने इराणच्या दोन तेल आणि नैसर्गिक वायू शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले केले. इराण हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे.

कच्च्या तेलाच्या किमती वाढत गेल्यास तेलविक्री कंपन्यांना पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवाव्या लागतात. यामुळे वाहतूक, अन्नपदार्थ तसेच इतर वस्तू महाग होऊ शकतात. इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे सर्वाधिक फटका आधीच कर्जबाजारी असलेल्या पाकिस्तानलाही बसला. तिथे पेट्रोल आणि डिझेलचे भाव भारताच्या तुलनेत दुपटीने वाढले. पाकिस्तानच्या हाय स्पीड डिझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे आठ आणि पेट्रोलच्या किमतीत प्रति लिटर चार रुपये ८० पैसे पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली. आता तिथे हाय स्पीड डिझेल २६२ रुपये प्रति लिटर तर पेट्रोल २५८ रुपये प्रति लिटर झाले आहे. अगोदरच युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास संघर्षाचे जगातील वस्तू बाजार किंवा कमोडिटी मार्केटवर विपरीत परिणाम झाले आहेत. इस्रायल-इराण तणावामुळे एका आठवड्यात कच्च्या तेलाचे भाव सोळा टक्क्यांनी वधारले. इराणने होरमुझ सामुद्रधुनी व्यापारासाठी बंद करण्याचे अतिरेकी पाऊल उचलू नये, यासाठी बरेच देश प्रयत्नशील राहिल्याचे गेल्या काही काळात पहायला मिळाले. भारतात ८७ टक्के खनिज तेल आयात केले जाते.



त्यापैकी बरेचसे तेल होरमुझच्या मार्गाने आणले जाते. तेलाचे दर वाढले की आयातखर्च वाढून वित्तीय तूट मर्यादेबाहेर जाते. अशा वेळी रिझर्व्ह बँकेला व्याजदरवाढीचा पर्याय स्वीकारावा लागतो आणि तसे झाल्यास उत्पादनवृद्धीवर प्रतिकूल परिणाम होतो.

२०२१ च्या दिवाळीनंतर कच्च्या तेलाचे भाव बॅरलला ८५ डॉलरपर्यंत पोहोचले तेव्हा देशातील पेट्रोल आणि डिझेलचे भावही विक्रमी पातळीवर पोहोचले होते. पेट्रोल आणि डिझेलचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होत असतो. त्यामुळे अन्नधान्यापासून खतांपर्यंत आणि दूध-अंड्यापासून फळे-भाजीपाल्यापर्यंत सर्व वस्तू प्रचंड महाग झाल्या होत्या. तेव्हा टोमॅटो ८० रुपये किलो आणि कोथिंबिरीची एक जुडी सव्वाशे रुपयाला गेली होती. इतकी महागाई कधी कुणी पाहिली आहे का? २०१८ नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव इतके कधीही वाढले नव्हते. २०२१ अखेर जगभर कोरोनाचे संकट निवळत चालले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थांना उभारी मिळू लागली. परिणामी, सर्वच वस्तूंची मागणी वाढत चालली आणि त्याचे पर्यवसान इंधनांच्या किमती वाढण्यात झाले. त्यावेळी जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांनी तेलाचे भाव वधारले असतानाही उत्पादनात टप्प्याटप्प्यानेच वाढ करण्याचे ठरवले होते. २०२० मध्ये ब्रेंट क्रुडची किंमत बॅरलला ४२ डॉलर होती. २०२१ अखेर ती दुपटीवर गेली. अशा वेळी मागणीच्या तुलनेत उत्पादन आणि पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढला असता, तर भाव खाली आले असते. परंतु तेल निर्यातदारांची 'ओपेक' ही संघटना तसेच तेल उत्पादकांचा दुसरा एक समूह यांच्या बैठकीत केवळ प्रति दिन चार लाख बॅरल्सनेच उत्पादन वाढवण्याचा निर्णय झाला.

कोव्हिडच्या काळात प्रवासबंदी असल्यामुळे अनेक देशांनी कच्च्या तेलाच्या उत्पादनकपातीचा निर्णय राबवला. परंतु कोविड संपल्यानंतर मागणीमध्ये लक्षणीय वाढ होत असूनही, तेलसंपन्न देशांनी त्यानुसार उत्पादन वाढवले नाही. सध्या चलनफुगवट्याचा दर २.५ टक्क्यांवर आला असून आणखी पाव टक्क्याने घसरेल, असा अंदाज केंद्र सरकारच्या ग्राहक कामकाज विभागाने व्यक्त केला आहे. परंतु, तेलाचे दर चढे राहिल्यास आणि अतिपावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास, भाववाढीचे संकट पुन्हा उद्भवू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

✦✦✦

पन्नाशी अनुभवणाऱ्या २५ जून १९७५ च्या आणीबाणीच्या काळात अनेकांची धरपकड झाली, तुरुंगवास भोगावा लागला. मूलभूत अधिकारांचा संकोच झाला. अर्थात तो अनुभव घेणारे आज देशात अघोषित आणीबाणी आहे, असे म्हणतात. तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या गुर्मीमुळे आणीबाणी लादावी लागली, तर आता विकासाच्या, संस्कृतीच्या नावाखाली वेगवेगळ्या यंत्रणांच्या आधारे आणीबाणी लागू करण्यात आल्याची टीका होत होत आहे.

# आणीबाणी तेव्हाची आणि आताची

विश्लेषण
नंदकुमार काळे

पाहता पाहता देशात आणीबाणी लादली गेली, त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. ही देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एक अत्यंत महत्वपूर्ण घटना. आज मागे वळून पाहताना या घटनेचे गंभीर पडसाद उमटलेले दिसतात. इंदिरा गांधींनी लादलेली घोषित आणीबाणी अनुभवणारे बडे नेते, ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आजकाल पुन्हा आणीबाणी अवतरल्याचा आरोप करतात. हे नेते काँग्रेसचेच आहेत असे नाही. शिवाय याविषयी काँग्रेसवाले कोणत्या तोंडाने बोलणार? अर्थात, काही इंदिरानिष्ठ नेते आजही आणीबाणीच्या तत्कालिन अपरिहार्यतेचे समर्थन करतात; पण आणीबाणी ही घोडचूकच होती, अशी कबुली देत बहुतांश काँग्रेसजन या लांच्छनातून स्वतःची आणि पक्षाची सुटका करून घेण्यासाठी धडपडतात. 'सर्व ज्येष्ठ नेते तुरुंगवासात असल्यामुळे आपण भूमिगत राहून आणीबाणीविरुद्ध प्रचारसाहित्य बनवले. त्या वेळी गांधीवादी लोकांसोबत काम करण्याची संधी मिळाली,' असे मोदी सांगतात. 'आणीबाणीचे स्मरण करत गळे काढण्याची आपली प्रकृती नाही. आणीबाणीमध्ये आलेल्या संकटांमध्ये भारताची लोकशाही तावून-सुलाखून निघाली. चोहोबाजूंनी अन्याय होत असताना त्याविरुद्ध लढण्याची एक जिद्द असते. ती मूल्यांसाठी जगण्याची ताकद देते. आणीबाणीतून मिळालेला हा सर्वात मोठा धडा आहे,' असे आणीबाणीविषयीचे मोदी यांचे चिंतन असले, तरी भारतीय जनता पक्षाने ज्या पद्धतीने आणीबाणीविरोधात मोहीम उघली आहे, ते पाहून काँग्रेसला पुन्हा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची व्यूहनीती आखली आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

मोदी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये इंदिरा गांधीच्या १९७१ च्या निवडणूक प्रचार आणि व्यवस्थापन तंत्राची माहिती घेतली होती. स्वाभाविकच इंदिरा गांधींनी केलेल्या चुका टाळून सर्वसामान्यांवर आणीबाणी न लादता व्यवस्थेवर आपला वरचष्मा प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर आहे. इंदिरा गांधी यांच्या पावलावर पाऊल टाकणारे मोदी स्वतःच्या प्रतिमेबद्दल कमालीचे जागरुक आहेत. इंदिरा गांधींइतकेच ते महत्त्वाकांक्षीही आहेत. जनधारणा प्रतिकूल होणार नाही आणि जनमानसातील प्रतिमा बिघडणार नाही याची काळजी घेत ते राजकीय अडथळे दूर करण्याच्या प्रयत्नात असतात. इंदिरा गांधींच्या आणीबाणीला त्यांचे पुत्र संजय गांधींमुळे दहशतीचे परिमाण लाभले.





इंदिरा-संजय गांधींच्या जोडीच्या तुलनेत मोदी-अमित शहा जोडी अधिक चातुर्याने अघोषित आणीबाणी हाताळत आहे. केंद्रात सत्तेत आल्यानंतर सत्तेतून आणखी सत्ता मिळवत त्यांनी पक्षावर आणि देशातील एकूणच सत्ताकारणावर आपली पकड घट्ट केली आहे. इंदिरा गांधींच्या आणीबाणीच्या तुलनेत मोदी यांच्या राजवटीतील अघोषित आणीबाणीला मर्यादा आहेत. कारण जमाना बदलला आहे. इंदिरा गांधींची आणीबाणी भोगणारे पंचवीस टक्के लोकही आज देशात नसतील. आणीबाणीनंतर दृढ झालेले अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि इतर मूलभूत हक्क हिरावून घेणे आता शक्य नाही. आज 'सोशल मीडिया'ला काबूत ठेवणेही अवघड आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या सर्व मार्केटिंग तंत्रानिशी देशात आणि देशाबाहेर आपली प्रतिमा अबाधित राखण्याचे आव्हान मोदींपुढे आहे.

बरोबर ५० वर्षांपूर्वी, २५ जून १९७५ च्या रात्री इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने अचानक संपूर्ण देशात आणीबाणी जाहीर केली. या निर्णयानंतर, नागरिकांचे मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली, विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि सर्वांचा आवाज दाबण्यात आला. भारतात यापूर्वी दोनदा आणीबाणी लागू करण्यात आली होती, परंतु त्यामागे युद्ध किंवा बाह्य हल्ला अशी ठोस कारणे होती. २६ ऑक्टोबर १९६२ रोजी चीनशी युद्ध झाल्यानंतर देशात पहिल्यांदाच आणीबाणी लागू करण्यात आली. तेव्हा जवाहरलाल नेहरू पंतप्रधानपदी होते. ही आणीबाणी १९६८ पर्यंत चालली. १९७१ ची दुसरी आणीबाणी ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तान युद्धामुळे लागू करण्यात आली. हे युद्ध बांगलादेशच्या स्वातंत्र्याशी संबंधित होते आणि देशाच्या सुरक्षेला धोका होता. या वेळी व्ही. व्ही. गिरी राष्ट्रपती होते. १९७५ ची तिसरी आणीबाणी २५ जून १९७५ च्या रात्री इंदिरा गांधी सरकारने अंतर्गत अस्थिरतेचे कारण देत अचानक लागू केली, मात्र खरे कारण न्यायालयाचा निर्णय होता. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द केली होती आणि त्यांना सहा वर्षे निवडणूक लढवण्यास मनाई केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्यासाठी देशभरात निदर्शने सुरू झाली. इंदिरा गांधी यांनी स्वतःला वाचवण्यासाठी आणि सत्तेत राहण्यासाठी राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांना आणीबाणी जाहीर करण्यास भाग पाडले.

ही आणीबाणी पूर्ण २१ महिने म्हणजे २१ मार्च १९७७ पर्यंत चालली. आणीबाणीच्या काळात संविधानाच्या कलम ३५२ अंतर्गत देशातील नागरिकांचे मूलभूत अधिकार रद्द करण्यात आले. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य रद्द करण्यात आले. सरकारच्या परवानगीनेच प्रत्येक बातमी प्रकाशित केली जाई. राजकीय विरोधकांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. त्यात जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांसारखी मोठी नावे समाविष्ट होती. १९७५ ची आणीबाणी अजूनही भारतीय लोकशाहीचा सर्वात काळा अध्याय मानली जाते. ती इंदिरा गांधींच्या हुकूमशाही विचारसरणीचे आणि सत्तेच्या भुकेचे प्रतीक मानली जाते. आजही राजकीय पक्ष या निर्णयासाठी काँग्रेस आणि इंदिरा गांधींना कोंडीत पकडतात. इंदिरा गांधींनी संवैधानिक तरतुदींच्या मदतीने आणीबाणी लादली; परंतु आणीबाणीच्या काळात जे काही घडले ते आज औपचारिक घोषणा न करता घडत आहे. फरक इतकाच आहे, की आणीबाणीच्या काळात ते शिस्तीच्या नावाखाली केले गेले, तर आज विकास आणि राष्ट्रवाद हे मंत्र आहेत. आणीबाणीच्या काळात खुशामत आणि राजकीय ढोंगीपणाच्या मर्यादा ओलांडत तत्कालीन काँग्रेस



अध्यक्ष देवकांत बरुआ यांनी 'इंदिरा म्हणजे भारत, भारत म्हणजे इंदिरा' असा नारा दिला.

आज भाजपमध्ये रविशंकर प्रसाद, शिवराजसिंह चौहान आणि देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते अगदी खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत अनेक नेते मोदी यांचे दैवी शक्तीचे मूर्त स्वरूप किंवा अलौकिक क्षमतचे म्हणून वर्णन करतात. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मोदींना देवांचेही नेते म्हटले, तेव्हा इंदिराजींच्या काळातील राजकीय खुशामतीत आणि सध्याच्या खुशामतीत काहीच फरक नसतो, हे लक्षात आले. आज लोकशाहीची रक्षक म्हणता येतील, अशा संघटना कमी आहेत. आज पुन्हा एकदा सरकारी मंत्री न्यायालयांना खटले कसे निकाली काढायचे याबद्दल सल्ला देताना दिसतात. न्यायालयांनीही सरकारच्या हेतूंनुसार निर्णय दिले आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सार्वजनिक व्यासपीठांवर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचे कौतुक करतात; त्यांची विशेष प्रशंसा पंतप्रधान मोदी यांच्यासाठी राखीव असते. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षाच्या सोयी लक्षात घेऊन निवडणुकांचे वेळापत्रक आखले जातात. माहिती अधिकार कायदा जवळजवळ निष्प्रभ झाला आहे. सीबीआय, प्राप्तिकर विभाग आणि अंमलबजावणी संचालनालय यासारख्या संस्था सरकारशी असहमत असलेले विरोधी पक्षनेते, सामाजिक कार्यकर्ते, लेखक आणि बुद्धिजीवींना त्रास देण्यासाठी साधने बनल्या आहेत. या कामातही, न्यायव्यवस्था सरकारला अप्रत्यक्षपणे सहाय्यक म्हणून काम करते.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यमांची स्थितीही आज चिंताजनक आहे. आज पत्रकारिता आणीबाणीनंतर होती तशी राहिलेली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांचा या क्षेत्रात प्रवेश आणि माध्यम गटांमध्ये असलेली नफा कमावण्याची स्पर्धा. नफेखोरीमुळे माध्यम संस्था पूर्णपणे जनविरोधी आणि सरकारच्या समर्थक बनल्या आहेत. सरकारी आणि बिगरसरकारी माध्यमांमधील फरक जवळजवळ संपला आहे. व्यावसायिक विचारांमुळे माध्यमांची आक्रमकता आणि निष्पक्षता केवळ कमी होत नाही तर व्यावसायिक, नैतिक आणि लोकशाही मूल्ये आणि नागरी हक्कांबद्दलची त्यांची वचनबद्धता देखील कमी होत आहे. परिणामी, देश एका अघोषित आणीबाणीला सामोरा जात आहे. आसपास कोणीच सुखी, समाधानी दिसत नाही. शासन, प्रशासन यापासून त्रस्त दिसत आहे. हे वास्तव समाज मान्य करेल, तो सूदिन...

✦✦✦

# क्वांटम कॉम्प्युटिंगची भन्नाट संकल्पना


**आजच्या तंत्रयुगात संगणकप्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते.**

तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर


संगणक म्हणजे काय याबाबतच्या कल्पना सतत बदलत आहेत. तीस वर्षांपूर्वी असलेली मेनफ्रेम संगणकाची क्षमता आता ५जी स्मार्टफोनमध्ये काही वर्षात येईल. अनेक विकसक नवनवीन कल्पना राबवून व्यवसाय, जीवन, व्यापार, उद्योग, सरकारी कामकाज अशा अनेक बाबीत अभिनव प्रोग्रॅम्स/ॲप्स निर्माण करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात आपण वेगाने प्रगती करत आहोत. एके काळी केवळ विज्ञानकथांमध्ये पाहिले जाणारे तंत्रज्ञान आता प्रत्यक्षात येत आहे. आज आपण अशा एका तंत्रयुगात आहोत जिथे संगणक प्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु काही गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी आणखी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते. कालचे सुपर कॉम्प्युटर आता नवीन स्वरूपात येत आहेत. त्याचेच नवीन नाव आहे क्वांटम कॉम्प्युटिंग. हे एक वेगाने उदयाला येणारे तंत्रज्ञान आहे. ते शास्त्रीय संगणकांसाठी अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी क्वांटम मेकॅनिक्सच्या नियमांचा उपयोग करते. ही यंत्रे अर्ध्या शतकाहून अधिक काळ चालत आलेल्या शास्त्रीय संगणकांपेक्षा खूप वेगळी आहेत. क्वांटम संगणकाची संकल्पना सर्व प्रथम १९८२ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्र रिचंड फेयनमॅन यांनी मांडली. ज्याप्रमाणे संगणकाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले, त्याचप्रमाणे क्वांटम कॉम्प्युटिंग भविष्यात अनेक क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व बदल घडवण्याची क्षमता ठेवते.

हे तंत्रज्ञान केवळ पारंपरिक संगणकांच्या मर्यादा ओलांडून जटिल समस्या सोडवण्यास मदत करेल असे नाही, तर ते संशोधन, विकास आणि नवनवीन शोधांनाही चालना देईल. क्वांटम कॉम्प्युटर क्यूबिट्स वापरतात. क्यूबिट्स क्वांटम यांत्रिकीच्या नियमांवर आधारित असतात आणि त्यांच्यामध्ये सुपरपोझिशन आणि एंटँगलमेंट या दोन महत्त्वाच्या संकल्पना असतात. एंटँगलमेंट म्हणजे दोन किंवा अधिक क्यूबिट्स अशा प्रकारे जोडले जातात की, एका क्यूबिटची स्थिती बदलल्यास दुसऱ्या क्यूबिटची स्थितीही तत्काळ बदलते. यामुळे अत्यंत जटिल समस्या सोडवण्यासाठी प्रचंड समांतर प्रक्रिया करणे शक्य होते. साधे उदाहरण म्हणजे जसे साधा संगणक एका वेळी एक पुस्तक वाचेल आणि मग दुसऱ्या पुस्तकाकडे वळेल, पण क्वांटम कॉँप्युटर एकाच वेळी ग्रंथालयातील सगळी पुस्तके वाचायला घेईल. या क्वांटम नियमांमुळे क्वांटम कॉम्प्युटर पारंपरिक संगणकांना लागणाऱ्या दशके किंवा शतकांच्या तुलनेत काही मिनिटांमध्ये किंवा सेकंदात अत्यंत गुंतागुंतीच्या गणिताच्या समस्या सोडवू शकतात. क्वांटम संगणक प्रणालीमुळे माहितीची देवाणघेवाण, साठवण, माहिती प्रक्रिया सुरक्षितरित्या करता येईल. यामुळे हॅकिंगसारखे प्रकार रोखता येतील. क्वांटम संगणकाच्या माध्यमातून अतिगुंतागुंतीचे गणिती सिद्धांत साठवले जाऊ शकतील. संगणकीय मॉडेलच्या आधारे वैद्यकिय आजारावरील कारणे शोधता येतील.



क्वांटम कॉम्प्युटिंगची शक्ती वापरणाऱ्या संस्था जगातील काही मोठ्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत करू शकतात. औषध संशोधनापासून जागतिक कृषी, संरक्षण आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकतात. पर्यावरणक्षेत्रात हवामानात होणारे बदल टिपून त्यातील भूतकाळातील नियमांनुसार भविष्यातील निष्कर्ष म्हणजे हवामानाचे अंदाज काढणे महत्वाचे असते. हे अंदाज जितके बरोबर येतील, तितकी मदत मानवजातीला होईल. चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूकंप या नैसर्गिक आपत्तीला आपण अस्मानी संकट मानतो. त्यात दर वर्षी प्राणहानी व कोट्यवधी मालमत्तेचे नुकसानही होते. या ठिकाणी भविष्यातील क्वांटम संगणक खूप मदत करू शकतील. संगणकाचे सध्याचे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी, अतिउच्च संगणकीय संसाधने वापरतात. त्यासाठी प्रचंड मोठे विदा (डेटा) विश्लेषण करायची गरज असते. हे प्रकरण वेळखाऊ आणि खर्चिक आहे. क्वांटम कॉम्प्युटरमध्ये सध्याच्या कॉम्प्युटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी संगणकीय संसाधनांसह समस्या सोडवण्याची क्षमता आहे. यामुळे अधिक कार्यक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रोग्रॅम्स तयार होऊ शकतात, या तंत्राचे अनेक क्षेत्रांना दीर्घकालीन फायदे आहेत.

आरोग्यक्षेत्रात हे तंत्रज्ञान औषध शोध, जिनोमिक्स आणि वैयक्तिक आरोग्यसेवांना लक्षणीयरीत्या गती देऊ शकते. उत्पादन क्षेत्रासाठी ते पुरवठा साखळी व्यवस्थापन, खर्च कमी करणे आणि एकूण कार्यक्षमता सुधारणे हे उद्दिष्ट साध्य करू शकते. सध्या अनेक वाहनांवर जीपीएसद्वारे वाहन हालचाल व्यवस्थापन माहिती मिळवली जाते. अनेक सीसीटीव्ही कॅमेरे चलतचित्रे रेकॉर्ड करतात. पण, हे सर्व पाहणे आणि त्यावर निर्णय घेणे मानवाच्या क्षमतेबाहेरचे आहे. इथेच उच्च तंत्रज्ञानक्षम माहिती पृथःकरण महत्वाचे आहे. माहितीचे तत्काळ पृथःकरण हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया आहे. ही माहिती अनेक स्वरूपात असू शकते. उदा. प्रचलित दिशा आणि नकाशा शोधणे आणि त्यावरचे मार्गदर्शन, सॉफ्टवेअरने वाहनाच्या स्थानाचे द्रुतपणे विश्लेषण करणे आणि रिअल टाइम ट्रॅफिक समस्यांवर ड्रायव्हरला त्वरित मार्गदर्शन करणे. तसेच लक्षावधी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी साठवलेल्या अनंत प्रतिमांचे त्वरित पृथःकरण करून निष्कर्ष काढण्यासाठी अतिशक्तिशाली संगणक लागतात. इथेच क्वांटम संगणक उपयुक्त ठरतील. माणसांना फक्त अपवादांबद्दलच सांगितले पाहिजे, तरच त्वरित निर्णय घेतले जातील. आपला शेजारी मुख्य स्पर्धक असलेला चीन या क्षेत्रात खूप पुढे आहे. आपल्या देशातील वित्त, संरक्षण, जलसाठे, ऊर्जानिर्मिती अशा अनेक क्षेत्रातील माहितीचा गैरवापर टाळण्यासाठी, आपल्याला सायबर सुरक्षेतील प्रतिबंधक प्रणाली विकसित कराव्या लागतील. इथे क्वांटम संगणक उपयोगी ठरतील.



२०२३ मध्ये आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरु झाले. भारत एक नवीन झेप घेण्यासाठी आणि क्वांटम तंत्रज्ञानामध्ये जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशनची आता निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारे मिशनच्या स्वरूपात क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कार्यक्रम जाहीर करणारा भारत हा सातवा देश ठरला आहे. अमेरिका, चीन, कॅनडा, ऑस्ट्रिया, फिनलंड आणि फ्रान्स या देशांनी यापूर्वीच अशा मोहिमा सुरू केल्या आहेत. सुपरकंडक्टिंग आणि फोटोनिक तंत्रांसारख्या विविध प्लॅटफॉर्म्सवर आठ वर्षांमध्ये पन्नास ते एक हजार भौतिक क्यूबिट्स क्षमतेचा, मध्यम क्वांटम संगणक विकसित करणे हे नवीन मिशनचे उद्दिष्ट आहे. २०२३-२४ ते २०३०-३१ या आठ वर्षांच्या कालावधीत क्वांटम मिशनवर सहा हजार ६५ कोटी खर्च केले जातील. देशातील दोन हजार किलोमीटरच्या परिक्षेत्रातील ग्राउंड स्टेशन्समधील उपग्रह आधारित सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, इतर देशांसोबत लांब पल्ल्याचे सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, दोन हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराचे आंतरशहर क्वांटम नेटवर्क हे मिशनचे इतर पैलू आहेत. हे मिशन आण्विक यंत्रणा आणि अणुघड्याळांमध्ये उच्च संवेदनशीलतेसह सुसज्ज मॅग्नोमीटर विकसित करण्यात मदत करेल. क्वांटम उपकरणे तयार करण्यासाठी सुपरकंडक्टर, नवीन सेमीकंडक्टर आणि टोपोलॉजिकल सामग्रीच्या डिझाइनमध्येदेखील हे मदत करेल. मिशनअंतर्गत क्वांटम कॉम्प्युटिंग, क्वांटम कम्युनिकेशन, क्वांटम सेन्सिंग आणि मेट्रोलॉजी, क्वांटम सामग्री आणि उपकरणे या क्षेत्रात चार केंद्रे स्थापन केली जातील.

क्वांटम कॉम्प्युटिंग हे एक असे तंत्रज्ञान आहे, जे आपल्या भविष्याची दिशा बदलू शकते. हे केवळ वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचे प्रतीक नाही, तर मानवाच्या सर्वात मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता असलेले एक शक्तिशाली साधन आहे. औषधनिर्माण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, हवामान बदल आणि सामग्री विज्ञान यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये ते क्रांती घडवून आणेल. सध्या या तंत्रज्ञानासमोर काही आव्हाने असली तरी, संशोधक आणि शास्त्रज्ञ त्यावर मात करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. क्वांटम कॉम्प्युटिंगचे महत्त्व केवळ गती आणि कार्यक्षमतेपुरते मर्यादित नाही, तर ते आपल्याला आजपर्यंत न सुटलेल्या जटिल समस्यांवर उत्तरे शोधण्याची आणि मानवजातीसाठी एक उज्वल भविष्य घडवण्याची संधी देते. येत्या काही दशकांमध्ये क्वांटम कॉम्प्युटिंग आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनेल आणि आपले जग पूर्वीपेक्षा अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि प्रगतशील बनवेल अशी अपेक्षा आहे.

deepak@deepakshikarpur.Com
**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

◇◇◇

# केरळचा आदर्श

राज्यरंग

व्ही. त्याराजन

**प्रत्येक राज्यातील धोरणकर्त्यांना आणि प्रशासनाला केरळच्या यशोगाथेतून शिकण्याची आणि स्वतःच्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारे कायदे, धोरणे आणि कार्यक्रम अंमलात आणण्याची प्रेरणा घेणे शक्य आहे. केरळने साक्षरतेपाठोपाठ घालून दिलेला डिजिटल साक्षरतेचा मापदंड देशाने राष्ट्रीय पातळीवर अनुकरणात आणण्याची गरज आहे. केरळने या क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा हा परिचय.**

भारत हे एक विशाल आणि वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे. ते डिजिटल युगाकडे वेगाने वाटचाल करत आहे. सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'डिजिटल इंडिया' सारख्या मोहिमा भारताला तांत्रिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. असे असले, तरी आजही देशातील बहुतेक ग्रामीण आणि मागास भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव हा एक मोठा अडथळा आहे. केरळने मात्र पूर्ण डिजिटल साक्षरता प्राप्त करून या दिशेने एक अभूतपूर्व पाऊल टाकत देशासमोर एक उदाहरण ठेवले आहे. त्याची अधिकृत घोषणा अद्याप झाली नसली, तरी हे लक्षात घेण्यासारखे आहे की या मोहिमेत केरळ राज्याने सुमारे २१ लाख लोकांना डिजिटल साक्षर केले आहे. ही कामगिरी केवळ तांत्रिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. केरळ राज्याचे हे मॉडेल संपूर्ण भारतात लागू केल्यास दूरगामी परिणाम दिसू शकतील आणि विकसित भारताच्या आपल्या स्वप्नाला पंख देऊ शकतील, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. केरळने डिजिटल साक्षरता ही समाजातील प्रत्येक घटकाला सामावून घेणारी एक व्यापक आणि समावेशक मोहीम म्हणून हाती घेतली. हे काम स्वयंमदत गटांनी सुरू केले. ते डिजी केरळ प्रकल्पापासून सुरू झाले. त्याला देशातील पहिली ग्रामीण डिजिटल साक्षरता योजना म्हणता येईल. या योजनेअंतर्गत राज्यभरात २१ लाखांहून अधिक डिजिटल निरक्षर नागरिकांची आेळख पटवण्यात आली आणि त्यांना संगणक, इंटरनेट आणि डिजिटल सेवांमध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण देण्यात आले.

या अतुलनीय प्रयत्नातून राज्याच्या कानाकोपऱ्यात केवळ डिजिटल शिक्षण दिले जात नाही, तर सरकारच्या ई-गव्हर्नन्स सेवा सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले जात आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मोहिमेत महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. 'कुडुम्बश्री'सारख्या महिला सक्षमीकरण गटांना डिजिटल प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यांच्या समुदायांमध्ये डिजिटल साक्षरता पसरवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. यामुळे केवळ तांत्रिक ज्ञान पसरले नाही, तर महिलांची सामाजिक भूमिकाही बळकट झाली. याशिवाय केरळने प्रत्येक वयोगटातील लोकांना हे ज्ञान आणि कौशल्ये मिळतील हे सुनिश्चित केले, मग ते विद्यार्थी असोत, गृहिणी असोत, मनरेगा कामगार असोत, शेतीत गुंतलेले तरुण असोत किंवा वृद्ध; केरळच्या या यशाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा उच्च साक्षरता दर आणि शिक्षणव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा स्वीकार. निःसंशयपणे, राज्य सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीनेही या मोहिमेला गती देण्यात मोठी भूमिका बजावली आहे. याशिवाय, सामाजिक सहभाग आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची सहज उपलब्धता यामुळे या मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरूप मिळाले. स्थानिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांनीही या प्रयत्नात उत्साहाने भाग घेतला. आता प्रश्न असा आहे की हे मॉडेल संपूर्ण भारतात कसे राबवता येईल. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकच मॉडेल थेट राबवणे शक्य होणार नाही आणि योग्यही होणार नाही.



या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम प्रत्येक राज्याला त्यांच्या स्थानिक परिस्थितीनुसार हे मॉडेल तयार करावे लागेल. काही राज्यांमध्ये भौगोलिक अडथळे आहेत तर काहींमध्ये सामाजिक-कौटुंबिक परंपरा आहेत. हे सर्व लक्षात घेऊन डिजिटल शिक्षण कार्यक्रम तयार करावे लागतील. ग्रामीण भारतात अजूनही इंटरनेटची सुविधा मर्यादित आहे. त्यामुळे डिजिटल पायाभूत सुविधा आणखी मजबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'भारतनेट'सारख्या योजना जलद गतीने राबवाव्या लागतील. त्यामुळे प्रत्येक पंचायत स्तरावर ब्रॉडबँड सुविधा सहज उपलब्ध होईल. यासोबतच प्रत्येक जिल्हा आणि ब्लॉकमध्ये स्थानिक डिजिटल प्रशिक्षण केंद्रे स्थापन करावी लागतील. महिला, युवक आणि शेतकऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः महिला स्वयंसहाय्यता गट आणि अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करून त्यांच्या समुदायांमध्ये प्रशिक्षण कार्यात सहभागी करून घेता येईल. यामुळे समाजात डिजिटल जागरूकतेचे वातावरण निर्माण होईल आणि तंत्रज्ञानाचा समावेश जलद होईल. या मोहिमेत शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग क्रांतिकारी ठरू शकतो. स्थानिक तांत्रिक संस्था वेळोवेळी त्यांच्या विद्यार्थ्यांना जवळच्या ग्रामीण भागात प्रशिक्षणासाठी प्रेरित करू शकतात. यामुळे तरुण विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल. खासगी संस्था आणि गैरसरकारी संस्थांच्या सहकार्याने सार्वजनिक-खासगी भागीदारीअंतर्गत ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सरकारला दररोज नवोपक्रम करण्यासाठी जोरदार प्रयत्न करावे लागतील.

या मोहिमेसाठी तांत्रिक कौशल्ये, ज्ञान, सामग्री आणि संसाधनांच्या स्वरूपात खासगी क्षेत्र महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. याशिवाय, डिजिटल साक्षरतेची सामग्री आणि संसाधने स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून सामान्य नागरिक ते सहज समजू आणि वापरू शकतील. या प्रयत्नांमध्ये अंमलबजावणीचे निरीक्षण आणि मूल्यांकन करण्याची एक मजबूत व्यवस्था तयार करणे आवश्यक आहे. कोणत्याही राज्यात ही योजना तुलनेने मंद गतीने सुरू असल्यास वेळेत सुधारणात्मक पावले उचलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. इतकेच नाही, तर लोकांच्या सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणण्याचीही गरज आहे. असे झाल्यास ते तंत्रज्ञान सहजपणे स्वीकारू शकतील. या प्रयत्नात निश्चितच काही आव्हाने असतील. काही राज्यांना संसाधनांचा अभाव जाणवू शकतो तर कुठे तरी तांत्रिक प्रशिक्षकांची उपलब्धता ही समस्या असू शकते. अनेक समुदायांमध्ये, वडीलधारी आणि रूढीवादी विचारसरणीमुळे तंत्रज्ञान स्वीकारण्यात अडचण येऊ शकते; परंतु सरकार, समाज, खासगी आणि इतर भागधारकांनी नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास हे काम अशक्य नाही. केरळचे डिजिटल साक्षरता मॉडेल देशासाठी एक आदर्श उदाहरण आहे. 'डिजिटल इंडिया'च्या स्वप्नाला मूर्त स्वरूप द्यायचे असल्यास इतर राज्यांना केरळकडून शिकावे लागेल, स्थानिक गरजांनुसार योजना आखाव्या लागतील आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या सहभागाने देशभर डिजिटल साक्षरतेच्या चळवळीचा प्रसार करावा लागेल. तरच भारत एक मजबूत आणि समावेशक डिजिटल राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकेल.

केरळने हे कसे साध्य केले, हा ही अभ्यासाचा विषय आहे. हे एकाएकी झाले नाही. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील महिलांवर विशेष भर देऊन विद्यार्थ्यांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आठ जिल्ह्यांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात सुरू करण्यात आलेला हा व्यापक डिजिटल साक्षरता उपक्रम या उपेक्षित समुदायांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक असमानता दूर करण्यासाठी समर्पित आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था आणि राज्य मुक्त आणि जीवनभर शिक्षण परिषद यासारख्या संस्थांचा सक्रिय सहभाग या प्रकल्पांमध्ये स्वीकारल्या जाणाऱ्या व्यापक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करतो. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या दिशेने केरळची प्रगती केवळ शिक्षणाप्रती असलेले त्यांचे समर्पण दर्शवत नाही, तर डिजिटल युगात व्यक्तींना सक्षम बनवण्यात तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिकादेखील अधोरेखित करते. विधानसभेचे सदस्य केरळच्या यशोगाथेपासून प्रेरणा घेऊन आपल्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारी धोरणे आणि कार्यक्रम तयार करून अंमलात आणू शकतात. त्यामुळे डिजिटल सक्षमीकरणाच्या व्यापक राष्ट्रीय ध्येयात योगदान मिळेल. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या केरळच्या वचनबद्धतेचा केवळ भारतातील मंत्री आणि आमदारांवरच नव्हे, तर संपूर्ण देशावर मोठा प्रभाव पडतो.

केंद्र सरकार विविध राज्यांच्या विविध गरजा लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात डिजिटल असमानता दूर करणारे उपक्रम



आखण्यासाठी केरळच्या मॉडेलपासून प्रेरणा घेऊ शकते. डिजिटल साक्षरता ही आर्थिक संधींशी आंतरिकरित्या जोडली आहे. डिजिटल कौशल्ये वाढवून व्यक्ती ई-कॉमर्स, ऑनलाइन फ्रीलान्सिंग आणि रिमोट वर्कसह डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यासाठी अधिक सुसज्ज असतात. केरळच्या उपक्रमांची प्रतिकृती बनवून राज्यातील नेते अशा आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊ शकतात. डिजिटल साक्षरतेवर अधिक लक्ष केंद्रित केल्याने भारतातील शैक्षणिक क्षेत्राला लक्षणीय फायदा होईल.

◇◇◇





सध्या जगभर युध्दाचे सावट पसरले आहे. कमी अधिक प्रमाणात त्याची झळ सर्वांनाच बसत आहे. अनेक देशांच्या युद्धात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अमेरिकेचा हात असतोच. हा देश नेमका कोणाच्या बाजूने आहे हे आजपर्यंत कुणालाही कळत नाही. एका देशाला मदत करत असताना त्याच्या शत्रू राष्ट्राला शस्त्रसामुग्री पुरवण्यातही अमेरिका आघाडीवर असतेच. पण सद्यस्थितीत जगभरातील ज्या देशांच्या प्रमुखांनी सत्तरी ओलांडली आहे, त्यांच्याकडून आततायी भूमिका घ्यायला सुरुवात झाली आहे. अनेक राष्ट्रप्रमुख नव्वदीपर्यंत टेकले. परंतु युद्धाची खुमखुमी त्यांच्यातच जास्त आहे. अयातुल्लाह अली खामनेई यांचे वय ८४ वर्षे म्हणजेच ते आता नव्वदीच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. तर नेटन्याहू ७५ वर्षे, पुतिन ७२ वर्षे, शी जिनपिंग ७२ वर्षे, नरेंद्र मोदी ७४ वर्षे, डोनाल्ड ट्रम्प ७९ वर्षे म्हणजेच या सर्वांचा प्रवास कमी अधिक प्रमाणित ऐंशीच्या दिशेने निघाला आहे. जर या सर्व नेत्यांचा नीट अभ्यास केला तर एक लक्षात येईल की, हे सगळे ७२ ते ८४ व्या वर्षी जगभर धिंगाणा घालत आहेत! यातील कोण बरोबर कोण चुकीचे याचे उत्तर काळ देईलच. पण त्यामुळे अनेक देश भविष्यात संकटात सापडतील हे निश्चित. इराण आणि इस्त्रायल यांच्यात युद्धविरामाची घोषणा झाली असून, गेल्या काही दिवसांपासून दोन्ही देश सध्या तरी शांत दिसत आहे. तरीही, इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्लाह अली खामनेई आपल्या 'बंकर'मधून बाहेर आलेले नाहीत. खामनेई यांना अजूनही भीती आहे की, युद्धविरामाच्या नावाखाली इस्त्रायल त्यांची हत्या करू शकतो. खामनेई आपल्या कुटुंबासह बंकरमध्ये लपले आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या विशेष युनिटकडे कोणतेही संचार साधन नाही. दोन्ही देश युद्धविरामावर सहमत झाल्यापासून खामनेई यांचे कोणतेही विधान समोर आलेले नाही आणि अशी बातमी आहे की, ते इस्त्रायलच्या धमकीला गांभीर्याने घेत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर त्यांचा अजिबात विश्वास नाही, त्यामुळेच खामनेई बाहेर येण्याचा धोका पत्करत नाहीत. आपल्या हत्येच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर अयातुल्लाह अली खामनेई यांनी आपला उत्तराधिकारी लवकरात लवकर जाहीर करण्यास सांगितले आहे. आतापर्यंत त्यांच्या उत्तराधिकारीसाठी दोन नावे पुढे आहेत. यापैकी एक नाव त्यांचा मुलगा मौलवी मोजतबा यांचे आहे, ज्यांना आपल्या वडिलांसोबत बराच काळ काम करण्याचा अनुभव आहे. दुसरे नाव आहे इस्लामी क्रांतीचे जनक खुमैनी यांचा ५३ वर्षीय नातू हसन खुमैनी यांचे. त्यांच्याकडे वंशपरंपरागत उत्तराधिकारी निवडला जात नाही. तरीही सर्वोच्च नेत्याचा निर्णय अंतिम असतो. जगाला युद्धाच्या खाईत ढकलून स्वतः बंकरमध्ये लपवून हे देश नेमके काय साधत आहे हेच कळत नाही. समोरासमोर लढाई करायची ताकद नसताना जनतेला युद्धात का लोटतात? असा सवाल जगाने या देशांना विचारला पाहिजे. लढाई कोणाचीही असो अमेरिकेची लुडबुड मात्र सर्वत्र दिसून येते.

# म्हातारे घालत आहेत जगभर युध्दाचा गोंधळ!


थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६११४२०

भारत पाकिस्तान यांच्यात मध्यंतरी झालेला वाद हा आपल्या दोन देशांमधील होता. पाकिस्तानने भारतात अतिरेकी पाठवून आपल्या २७ निरपराध नागरिकांची हत्या केली होती. त्याला भारताने चोख प्रत्युत्तर देखील दिले. अशावेळी अमेरिकेची भूमिका विचित्रच होती. यापूर्वीही भारताला त्यांचा अनुभव तसाच होताच.

अलीकडच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेला भेट देऊन 'माय फ्रेंड डोनाल्ड' असे म्हटले असले तरी ते कोणाचेच फ्रेंड होऊ शकत नाही असे वाटते. जगाच्या पाठीवर सगळ्यात मोठा आतंकवादी देश कोणता? तर तो अमेरिकाच असावा. ही अफगाणिस्तानात लपलेली टोळी नाही, इराकातली मंडळी नाही आणि पाकिस्तानातल्या मशिदीत बसलेली टोपी घातलेली लोकं नाहीत. जगावर दहशत निर्माण करणारा नंबर वन देश म्हणजे युएसए.

द्वितीय महायुद्धात हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकला. का? जपानने गुन्हा काय केला होता? अमेरिकेला आव्हान दिलं, हेच नाही का? मग लगेच अण्वस्त्र डागून लाखो निष्पाप नागरिकांचा भस्मासूर केला. त्यानंतर, त्यांच्या देशात लोकशाही वगैरे शिकवायला अमेरिकन पंडित पोचले. लोकशाही शिकवणारे कोण तुम्ही? त्यानंतर कोरिया, चीन, व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया, ग्रनाडा, पनामा, इराक, अफगाणिस्तान, लिबिया, सीरिया, यमन अशा एकेका देशात अमेरिकेच्या सैन्याने धाड घातली. हे सैन्य नव्हे, ही डाकूंची टोळी आहे!

स्वतःचं साम्राज्य वाढवण्यासाठी, तेलाच्या विहिरी झाकण्यासाठी, दुसऱ्यांच्या जमिनीवर डेमोक्रसीचं टॉयलेट बांधण्यासाठी अमेरिकन रेंजर्स धाड घालतात.

कधी कोणती एनएसजी विचारते? कोणती युनायटेड नेशन्स त्यांना रोखते? कोणते मानवाधिकार संघ त्यांना पाय रोखून धरतात? युरोपियन देश? ते तर अमेरिकेच्या मांडीवर बसलेत. नाटो नावाच्या भीतीवर सारेजण बांधले गेलेत. प्रश्न एवढाच आहे की, हे सगळं काही जग मुकाट बघतंय. कधी युरोपने, कधी संयुक्त राष्ट्राने, कधी प्रसिद्ध मीडिया संस्थांनी अमेरिकेच्या या दहशतीचा निषेध केलाय का? नाही! कारण त्यांचं पोट अमेरिकेच्या डॉलर्सवर पोसलेलं आहे.

सीएनएन, बीबीसी, एफओएक्स वगैरे नुसते टीआरपीचे रडके पोरं झालेत. खरं बोलण्याचं त्यांच्यात धाडस उरलेलं नाही. अमेरिकेच्या ह्यड्रोन स्ट्राईकह्लमध्ये मरणारं प्रत्येक बाळ निष्पाप असतो. अमेरिकेच्या मिसाइलने उद्ध्वस्त होणारी प्रत्येक मशिद, चर्च, मंदिर, हरवलेलं घर, फुटलेली शाळा सगळी मानवीय शोकांतिका असते. पण त्यात 'ग्लोबल सिक्युरिटी'च्या नावाखाली जायज हत्या केल्या जातात.

आज सगळं जग, अमेरिकेच्या दहशतीला लोकशाहीची शिकवण मानून गप्प बसलंय. सगळ्यात मोठं दुर्दैव म्हणजे, आपण भारतीयही हाच तमाशा हातावर हात ठेवून बघतोय. शब्दात सांगायचं झालं तर आंतरराष्ट्रीय डाकूगिरीला जर लोकशाहीचा मुखवटा मिळाला, तर त्याला अमेरिका म्हणतात.

लोकशाहीचा हा खेळ संपायला पाहिजे. नाहीतर ज्यांनी निसर्गाशी युद्ध केलं, इतर देशांवर हल्ले केले, तिकडच्या जनतेला हलाखीत लोटलं हेच गुन्हेगार मानवजातीच्या शेवटाला कारणीभूत ठरतील आणि मानवजात संपायला वेळ लागणार नाही. माणूसच आता आपल्या विनाशासाठी उतावीळ झालाय हेच खरं.

व्हेनेझुएला, इराण, रशियाकडून तेल घ्यायचं नाही. घ्यायचं ते फक्त आमच्याकडून आणि तेदेखील चढ्या भावाने. वरून पेमेंट करायचं ते रोखीत आणि फक्त डॉलरमधेच. ट्रम्पची आमच्यावर ही दादागिरी चालते! आणि आम्ही तो सारं काही मान्य करत त्याच्यासमोर वाकतो.

आणि इराण...? रशियाप्रमाणेच अडचणीत आम्हाला साथ देतो. तोदेखील आम्हाला तेल देत होता. पण कसं? तर, क्रेडिटवर. बिल द्यायचं तेदेखील आपल्या चलनात. आणि त्याच रकमेतून इराण भारतात त्याला हवी ती खरेदी करत असे! ही त्याच्या मित्रत्वाची खूण होती!

काश्मीर प्रश्न जेव्हा केव्हा युनो समोर आला, तेव्हा इराणने आपला पक्ष घेतला आणि अमेरिकेनं पाकिस्तानचा आणि आज आम्ही आक्रमक इस्त्राईलला दोष देऊन त्याचा निषेध करण्याऐवजी इराणला सबुरी शिकवतोय.

आज छोटे छोटे देशही इराणची बाजू घेत इस्त्राइलचा निषेध करताहेत, पण महासत्ता म्हणवून घेणारा देश आणि त्याचे समर्थक अमेरिका आणि इस्त्राइलचा निषेध करण्याऐवजी तोंड बंद करुन बसलेय.

या सर्व घडामोडींमुळे गॅसच्या किंमतीचा भडका उडण्याची शक्यता दिसते. फक्त पंधरा दिवस पुरेल इतकाच साठा शिल्लक असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आपल्याला इराण इस्त्रायल युद्धाची झळ बसणार नाही का?

इराणच्या तीन मुख्य आण्विक तळांवर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांमुळे जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक प्रदेशातून पुरवठा खंडित होण्याची भीती आणखी वाढली आहे. आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांटमध्ये भारताची एलपीजी साठवण क्षमता राष्ट्रीय सरासरी वापराच्या फक्त सोळा दिवसांसाठी पुरेशी आहे. इराण आणि इस्त्रायलमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम आपल्या स्वयंपाकघरातही दिसून येण्याची शक्यता आहे.

येत्या काळात देशात एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढू शकतात. इराणच्या अणुस्थळांवर अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक प्रदेशातून पुरवठा खंडित होण्याची भीती आणखी वाढली आहे. अशा परिस्थितींसाठी तयारी करताना, भारतीय धोरणकर्ते आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी हे ओळखले आहे की, सर्व इंधने समान धोके निर्माण करत नाहीत.

पश्चिम आशियामध्ये तणाव वाढतो तेव्हा एलपीजी सर्वात जास्त असुरक्षित असते. डोनाल्ड ट्रम्प कोणताही मोठा निर्णय घेण्यासाठी काही वेळ घेतील, म्हणजे सध्या तरी इराणवर हल्ला करण्याचा निर्णय पुढे ढकलला आहे.

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्ध आता इतके टोकाला गेले आहे की रुग्णालयाच्या बदल्यात रुग्णालय, अणुऊर्जा प्रकल्पाच्या बदल्यात अणुऊर्जा प्रकल्प, आणि मीडियाच्या बदल्यात मीडिया अशा थरावर युद्ध चालले आहे. ट्रम्पने सध्या तिसऱ्या महायुद्धाची शक्यता काहीशी कमी केली आहे. आता पुढे काय होईल याची प्रतीक्षा करणे एवढेच आपल्या हातात आहे.

## ज्या देशात विकृती आहे ते नष्ट होणारच...

इराणचा विनाश त्या दिवशी निर्मात्याने ठरवला होता, जेव्हा एका वडिलांना सरकारविरोधी सोशल मीडिया पोस्टसाठी त्याच्या मुलीसमोर सार्वजनिकरित्या फाशी देण्यात आली. जिथे वडील आपल्या मुलीच्या शेवटच्या क्षणी तिच्या डोळ्यात पाहत हसत होते जेणेकरून मुलीचा आत्मा तुटू नये. जगातील प्रत्येक व्यक्तीचे हृदय हादरवून टाकणारे हे आणि असे शेकडो दृश्ये कोणाला आठवत नाहीत? जिथे ठराविक ड्रेस कोड न घातल्याबद्दल महिलांचे केस कापून, त्यांना नग्न करून इतकी मारहाण केली जाते की, महिला रुग्णालयात वेदनेने विव्हळत मरतात. ज्या देशात अशी विकृती आहे, असे अत्याचार आहेत ते नष्ट होणारच आहेत. बेंजामिन नेतान्याहू त्यांच्या विनाशाचे फक्त माध्यम आहेत. दुसरीकडे इस्त्रायलने गाजामधील उपाशी लोकांवर, जे फक्त अन्न आणायला आले होते, रागाच्या भरात गोळीबार केला. यात ५९ लोक मृत्युमुखी पडले. इस्त्रायलमधील स्त्रिया पण हातात ताट घेऊन रस्त्यावर अन्नासाठी उतरल्या. तेल अवीव आता गाजासारखा दिसत आहे. इस्त्रायलचे श्रीमंतपण, ऐशोआराम आता हिरावले गेले आहेत. दोन्हीकडच्या बंदुकांच्या गोळ्या, बॉम्ब यामध्ये सामान्य नागरीकांच मरण होतय. राजकीय महत्वाकांक्षा आणि खुर्ची टिकवण्याची धडपड म्हणून सुरु केलेल्या युद्धात सैनिक मारले जाताहेत. अन्नपाणी मिळत नाही म्हणून लहान लेकर कुपोषणाने मरत आहेत. दवाखाने, हॉस्पिटलवर बॉम्ब पडत आहेत. युद्धात कोण जिंकेल, निकाल काय लागेल तो नंतरचा भाग. माणसांची होरपळ नक्की आहे. या हिंसेला विरोध अस का आपण म्हणत नाहीत ? युद्धच नको अस का म्हणत नाहीत ?

## इराणमध्ये असं कोणतं विशेष ज्ञान मिळतं?

इराणमध्ये शिकायला गेलेल्या सर्व भारतीय विद्यार्थ्यांची सखोल चौकशी केली पाहीजे. इराण इस्त्रायल युद्ध सुरु झाल्यामुळे तेथील हजारो भारतीय विद्यार्थी घरी येऊ पाहत आहेत. त्यांच्यासाठी विशेष विमानाची सोय भारत सरकार करीत आहे. पण एक असा गंभीर प्रश्न येतो आहे की, इराणमध्ये असं कोणतं विशेष ज्ञान मिळतं की जे भारतात मिळत नाही, अन्य युरोपीय देशात मिळत नाही, अमेरिकेत मिळत नाही, की ज्यामुळे हजारो भारतीय मुले मुली इराणमध्ये जाऊन शिकत आहेत? इराण हा कट्टर इस्लामी देश आहे. तिथे हिंदू , खिश्चन, बौद्ध, शीख इत्यादी धर्माच्या विशेषतः मुलींना कोणते शिक्षण मिळते ? हे सर्व शंकास्पद वाटते आहे आणि म्हणूनच गंभीर आहे. इराण हा देश कोणत्याही उच्च तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध नाही किंवा तिथे लाखो तरुणांना रोजगार मिळतो यासाठी सुद्धा तो देश प्रसिद्ध नाही. तर इराणमध्ये इतके तरुण-तरुणी का जात आहेत ? त्यांचा तेथील शिक्षणाचा, राहण्या- खाण्याचा खर्च कोण करतात ? कोणी प्रायोजक आहे काय ? हे गौडबंगाल काय आहे ? जाणारे भारतीय विद्यार्थी कोणत्या धर्माचे आहेत ? भारतातील कोणत्या विशिष्ट राज्यातून तिकडे जात आहेत का? त्यांचा मूळ उद्देश काय आहे ? हे सर्व शंकास्पद दिसत असल्यामुळे याची चौकशी होणे गरजेचे आहे. इराण मधून परत आणलेल्या ११० मुलांपैकी ९० जम्मु काश्मिर मधले आहेत. तेथीलच मुले इराणमधे जाणे का पसंत करतात? भारतातून आलेल्यांना तेथे काय काय शिकवतात हा चौकशीचा विषय आहे.

# निवडणूक नावाची परीक्षा

डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, नागपूर.

आता निवडणूका जवळ आल्यात. या निवडणूका स्थानिक पातळीवरचे लोकप्रतिनिधी निवडून देण्याकरिता येऊ घातल्या आहेत. म्हणजेच महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती वगैरे वगैरे! यांच्यात मतदारराजा हा नेते मंडळींची परीक्षा घेत असतो. ती कशी? तर आपल्या शालेय, महाविद्यालयीन परीक्षेप्रमाणे, आधी मार्क देऊन नंतर प्रगतिपुस्तक. अशी नाही बरं का!

या निवडणूक परीक्षेत, मतदार राजा नावाचा परीक्षक आधी, प्रगतीपुस्तक बघतो. आपल्या सांसद खासदार, विधानसभा आमदार, आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे एकत्रित प्रगतीपुस्तक बघून मगच मार्क देत असतो.

तर हे प्रगतीपुस्तक म्हणजे या लोकप्रतींनिधींनी आजपर्यन्त आपल्या मतदारसंघात कोण कोणती प्रगतीची कामे पूर्ण केलीत? दिलेल्या आश्वासनांच्या पैकी किती पूर्ण केली ? किती फक्त सुरवातीची उद्घाटने, पायाभरणीचे फलक लावून खितपत पडलीयेत? किती फक्त कागदावरच आहेत? किती आश्वासने केवळ तोंडाची वाफ म्हणूनच दवडली गेलीत? किती प्रगति योजना ख?याच या लोकप्रतींनिधींनी आणल्यात की पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्या असलेल्या सर्व जनता सामावेशक योजना आपल्या मतदार संघात येणारच होत्या त्यांचे श्रेय ही नेते मंडळी स्वतः च्या नावावर लाटण्याचा उद्योग करतायत ?

उदाहरणार्थ, आमच्या वानाडोंगरी परिसरात असलेली तीव्र पाणीटंचाई सदा टँकर भरोसे असणार का? वृक्षारोपणांनंतर त्या रोपट्यांची न झालेली देखभाल, बेरोजगारी, वाहतूक समस्या, युवक मंडळींचे ड्रग्स च्या आधीन होणे, तथा अनेकानेक बाबींचे प्रगतीपुस्तक नक्की पाहिल्या जाणारच ना?

न्यायालयीन प्रक्रियेत स्थानिक निवडणूका अडकल्याने केवळ प्रशासकांच्या हाती खोळंबलेले प्रश्न सोडविण्यासाठी, हाती सत्ता नसतांनाही किती नेते मंडळींनी जनता नारायणाला मदत करण्यासाठी कष्ट घेतलेत? याचाही ऊहापोह झाल्या शिवाय राहील का? एकमेकांवर चिखलफेक, दोषारोपण, जातीयवाद, गुंडगिरी, निवडणुकांत वाटलाजाणारा अमाप पैसा, दारु- फुकटचे नोन्वेज जेवण, असल्या गोष्टींना कंटाळ्ळेली जनता नव्या चांगल्या चांगल्या गोष्टींची अपेक्षा करत आहे.

माफक पैशात जनारोग्य सुविधा, शिक्षण, संरक्षण, न्याय , भ्श्टार्चार विरहित शासकीय कार्यालये, प्रदूषण मुक्त हवा व पाणी, इतक्याही क्षुल्लक अपेक्षित बाबी मतदार परीक्षकाने प्रगतीपुस्तकात बघणे कसे चूक असू शकते बरं? म्हणून आपणा सर्व आजी, माजी, उगवते असणाऱ्या नेते मंडळींना या परीक्षेसाठी All the Best !

■ ■ ■

# शेतकरी बापाला बाप म्हणायची लाज कसली?

नुकताच फेसबुकवर एक व्हिडिओ पाहण्यात आला. हा व्हिडिओ होता, एका शेतकरी बापाचा आणि हायकोर्टातील त्याच्या वकील मुलाचा. आपल्या मुलाला खरवस खूप आवडतो, म्हणून एकेदिवशी आई आपल्या मुलासाठी खरवस घेऊन त्या मुलाच्या बापाला कोर्टात पाठवते. राहणीमान साधे असल्यामुळे तो बिचारा शेतकरी बाप आपल्या शेतकरी पोशाखात तो खरवस घेऊन आपल्या मुलाला देण्यासाठी कोर्टात निघाला. कोर्टात गेल्यावर बापाने मुलाची विचारपूस केल्यावर मुलगा ऑफिसमध्ये असल्याचे बापाला समजले.

बाप ऑफिसमध्ये गेला आणि मुलाने बापाकडे पाहिले, तेव्हा बापाचा शेतकरी पोशाख पाहून मुलाला खूप राग आला. ऑफिसमध्ये इतर सहकारी वकील बसल्यामुळे त्या वकिलांसमोर मुलाला स्वतःच्या बापाला बाप म्हणायची लाज वाटू लागली. कारण बाप साध्या कपड्यात व शेतकरी पोशाखात आला होता. इतर वकिलांना हा आलेला माणूस जर माझा बाप आहे म्हणून कळाले तर माझा अपमान होईल, म्हणून त्या वकील मुलाने आपल्या बापाला ओळख न देता ऑफिस मधून बाहेर काढले. इथून चालते व्हा, परत इकडे येऊ नका म्हणून बजावून सांगितले.

तो बाप ऑफिसच्या बाहेर आला आणि त्या ऑफिसच्या खिडकी जवळ येऊन थांबला. इतर वकिलांनी त्या बापाच्या मुलाला विचारले की, हा आलेला माणूस तुमचा कोण होता? तेव्हा त्या मुलाने स्पष्ट भाषेत सांगितले की, तो आलेला माणूस माझ्या शेतातील सालगडी होता, त्या मुलाच्या बापाने मात्र खिडकी जवळ थांबून हे सर्व ऐकले, तेव्हा त्याच्या काळजात चर्र झाले, मनाला खूप वेदना झाल्या आणि तो बाप तिथून खरवस घेऊन घरी परत आला.

घरी आल्यावर तो बाप ढसाढसा रडू लागला. त्याचे काळीज फाटल्यासारखे झाले होते. ज्या मुलाला आपण जन्म देऊन लाडाकोडात लहानाचे मोठे केले. ज्याला बोटाला धरून चालायला शिकवले, त्याच्या शिक्षणासाठी जीवाचे रान करून व सावकाराचे कर्ज काढून त्याच्या शिक्षणाला पैसा लावला, त्याला उच्च शिक्षित करून त्याला हायकोर्टाचा वकील बनवले तोच मुलगा वकील झाल्यावर स्वतःच्या बापाला माझ्या शेतात काम करणारा सालगडी म्हणतो. तर त्या बापासाठी ही खरोखरच किती दुर्भाग्याची व खेदाची बाब म्हणावी लागेल. त्या बापाचे मन काय म्हणत असेल? याचा विचार करून बघा.

ज्या दिवशी त्या बापाला पोटच्या मुलाने सालगडी म्हटले तेव्हापासून तो बाप खूप डिप्रेशनमध्ये राहू लागला. सारखा उदास व निराश राहून विचार करू लागला. त्याच्या मनात सारखे आत्महत्येचे विचार रुंजी घालू लागले. पोटच्या मुलाने आपल्याला असे का म्हटले? आपण त्याला जन्म देऊन गुन्हा केला काय? त्याला याच्यासाठीच उच्चशिक्षित केले काय? त्याला मला बाप म्हणायची लाज का वाटते? बाप असून सुद्धा त्याने मला सालगडी का म्हटले? अनेक प्रश्न त्याच्या मनात थैमान घालू लागले. अखेर त्या बापाने टोकाचा निर्णय घेऊन व गळफास लावून आत्महत्या केली.

मुलाला ही बातमी समजल्यावर जेव्हा मुलगा मातीला आला तेव्हा मात्र ढसाढसा रडू लागला. त्याला आपली चूक लक्षात आली. आपण आपल्या बापाला उगीच सालगडी म्हटले. म्हणून तो पश्चातापात पडला होता. आपण आपला बाप गमावला म्हणून तो हंबरडा फोडू लागला. तेवढ्यात कोणीतरी म्हणाले तू बाप नाही तर देव गमावलास? पोरा.

आजकाल बापाच्या जीवावर शिकून मोठ्या पदावर विराजमान झालेले क्लासवन अधिकारी आपल्या जन्मदात्या आई-वडिलांना विसरून जात आहेत. आई-वडिलांच्या जीवावर आपला डोलारा उभा राहिला आहे, याचे त्यांना भान राहिले नाही. आई-वडिलांनी आपल्यासाठी किती कष्ट उपसले? किती परिश्रम करून आपल्याला उच्चशिक्षित केले?

आई-वडिलांमुळेच आज आपण सुखाचे दिवस बघत आहोत. आई-वडिलांनी जर आपल्याला शिक्षण शिकवले नसते, तर आज आपण कोणाच्यातरी दावणीला बांधलेले असतो. कोणाच्यातरी शेतात सालगडी म्हणून राहिलो असतो. आज आपले काय हाल असते? याचा विचार न केलेलाच बरा.

ज्या आई-वडिलांनी आपल्याला शून्यातून विश्व निर्माण करण्यासाठी खंबीरपणे साथ दिली, त्या आई वडिलांच्या उपकाराची जाणीव न ठेवता त्यांना जर गद्दार होत असाल, त्यांना बाप म्हणण्याऐवजी सालगडी जर म्हणत असाल तर तुमच्या त्या शिक्षणाला आणि तुमच्या त्या डिग्रीला काय जाळायचे आहे?

स्वतःच्या जन्मदात्या बापाला बाप म्हणायची जर लाज वाटत असेल तर तुम्ही आत्महत्या करून जीवन संपवलेले बरे. तुमच्या जीवन जगण्याला काहीच अर्थ राहणार नाही. बाप कसाही राहत असला, कसाही वागत असला, राहणीमान साधे असो किंवा उच्च दर्जाचे असो, कपडे मळके असो किंवा व्हीआयपी असो तर त्या बापाला बापच म्हणावे लागते.

बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर. जि. लातूर.
7498715661

केवळ बाप मळक्या कपड्यात म्हणजे शेतकरी पोशाखात भेटायला आला म्हणून बापाला सालगडी म्हणणारी औलाद जर बापाच्या पोटाला जन्माला आली असेल तर ती त्या बापासाठी खरंच किती दुर्भाग्याची बाब म्हणावी लागेल? शिकलेली मुले जर शिकून असे वागत असतील तर त्या शिक्षणाला काय किंमत?

असे कितीतरी उच्च शिक्षित नोकरदार आहेत जे की, बाप शेतकरी पोशाखात ऑफिसमध्ये भेटायला आल्यावर आपल्या सहकारी मित्रांसमोर अपमान होऊ नये म्हणून स्वतःच्या बापाला बाप म्हणण्याऐवजी नोकर, सालगडी किंवा वेटर म्हणतात. अशा निष्ठूर, अविचारी आणि निर्दयी नोकरदार मुलांनी स्वतःच्या नावापुढे बापाचे नाव काय म्हणून लावायचे?

बापाला नोकर किंवा सालगडी म्हणणारे उच्चशिक्षित नोकरदार आई-वडिलांना काय म्हणून सांभाळतील? म्हातारपणात त्यांची सेवा करतील का? का पत्नीचे ऐकूण त्यांना अंतर देतील? मला तर असे वाटते की, स्वतःच्या आईवडिलांना सालगडी व नोकर म्हणणारे नोकरदार आईवडिलांना म्हातारपणात वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवल्याशिवाय राहणार नाहीत. हे मलाच नाही तर कोणालाही मान्य करावेच लागेल.

आजकाल हायफाय संस्कृती निघाली आहे. आणि या हायफाय संस्कृतीत शेतकरी आईवडील कुठेच बसत नाहीत. शालेय आणि कॉलेज जीवनात मी पाहिलंय की, बरेच मुले मुली आपल्या शेतकरी बापाला शाळेत आणायला घाबरायचे. कारण त्यांना माहीत होते की, आपला बाप मळक्या शेतकरी पोशाखात राहतो. शाळेत आणल्यावर शिक्षकांसमोर आणि मित्र मैत्रिणींसमोर आपला अपमान होईल, मित्र व मैत्रिणी आपल्याला कमी समजतील या भीतीपोटी स्वतःच्या बापाला शाळेत न बोलावणारे विद्यार्थी देखील काही कमी नाहीत. यांना स्वतःच्या बापाला जर शाळेत आणि कॉलेजमध्ये आणायला लाज वाटत असेल. तर पुढे चालून हीच मुले मुली आपल्या बापाला सालगडी व नोकर म्हटल्याशिवाय राहणार नाही. स्वतःच्या बापाला म्हातारपणात निराधार केल्याशिवाय राहणार नाहीत.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एका मुलाचे आईवडील खूप गरीब होते. त्यांची परिस्थिती खूप हलाखीची होती. स्वतःला गुंठाभर देखील शेती नव्हती. दुसऱ्यांच्या शेतात काम केल्याशिवाय पोट भरत नसे. त्यांना तीन मुली व एक मुलगा होता. खाणारी तोंडे जास्त असल्यामुळे त्यांची आभाळ होत असे. अशा हालाखीच्या परिस्थितीत त्या बापाने अहोरात्र मेहनत करून व कष्टाची व अवजड कामे करून आपल्या मुलाला भरपूर शिक्षण शिकवले आणि उच्चशिक्षित करून त्याला एल.आय.सी ऑफिसर बनवले.

नुकताच तो मुलगा क्लासवन अधिकारी झाला आणि कामावर रुजू झाल्यावर काही दिवसांनी त्याचा बाप खुशीने व आनंदाने आपल्या ऑफिसर मुलाला भेटायला ऑफिसला गेला. बाप बिचारा आपल्या शेतकरी पोशाखात म्हणजे मळक्या कपड्यात मुलाला भेटायला गेला. मुलगा मात्र व्हीआयपी लोकांमध्ये टायकोटात खुर्चीवर बसलेला होता, अचानक त्याचा बाप ऑफिसमध्ये आला आणि मुलाला पाहून तो खूप आनंदी झाला.

मुलाला बोलू लागला पण मुलगा मात्र ओळख नसल्यासारखा करू लागला. तुम्ही कोण आहात? मी तुम्हाला ओळखत नाही. इथून चालते व्हा नाहीतर धक्के देत बाहेर काढावे लागेल असे म्हणू लागला. तेव्हा तो बिचारा बाप दुःखी होऊन तिथून निघून गेला. माझ्या मुलाने मला असे कसे बोलले? मी याला शिकवून काय गुन्हा केला का? याच्या शिक्षणासाठी जीवाचे रान करून पैसा लावला आणि शेवटी तो मला ओळख द्यायला सुद्धा तयार नाही. या विचाराने तो ग्रस्त झाला.

सारखा तोच तो विचार करू लागला. या विचाराने त्याचे जेवण सुद्धा कमी झाले आणि शेवटी तो मरण पावला. मुलाने बापाला खूप सुख द्यायचे सोडून, बापाला आनंदात ठेवायचे सोडून, बापाला दुःखाच्या महासागरात लोटून शेवटी उपकाराच्या बदल्यात मृत्यू दिला. म्हणजे आजकालची सुशिक्षित मुले आपल्या जन्मदात्या आई-वडिलांसाठी उपकाराच्या बदल्यात मृत्यू देत असतील तर त्यापेक्षा मुलांना शिक्षण न दिलेलेच बरे.

शिक्षण कोणत्या दर्जाचे मिळत आहे? आणि शिकलेली मुलेच असे का वागतात? मुलांना शिक्षणाबरोबरच संस्काराची सुद्धा गरज आहे हे प्रत्येक आई-वडिलांनी व शिक्षकांनी ध्यानात ठेवावे. मुलांना शिक्षण योग्य मिळत आहे म्हणून मुले नोकरीला लागत आहे. पण मुलांना योग्य संस्कार मिळत नाहीत म्हणून मुले आई-वडिलांसोबत वाईट व्यवहार करत आहेत. आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत. आणि म्हणूनच आजकालच्या सुशिक्षित नोकरदार मुलांना स्वतःच्या बापाला बाप म्हणायची लाज वाटत आहे. त्यासाठी शिक्षणाबरोबरच मुलांना संस्काराची गरज आहे....

■ ■ ■

# मनाला भिडणारे गीत





अलिकडेच आपण जागतिक संगीत दिन साजरा केला. त्यानिमित्ताने 'मर्जी की मालकिन' हे गाणे रिलीज करण्यासाठी बॉलिवूड अभिनेत्री पारुल गुलाटी पॉवरहाऊस गायिका सुनिधी चौहानसोबत दिसून आली. या दोघींनी मिळून हे गाणे सादर केले आहे. यशराज मुखते यांनी निर्मित आणि संगीतबद्ध केलेले हे गीत म्हणजे आकर्षक सूरच नाहीत तर ते महिलांच्या आयुष्य प्रवासाबद्दल भाष्य करणारे आहे. त्यांचे धैर्य, स्वातंत्र्य आणि निर्भय महत्त्वाकांक्षा या गाण्याद्वारे व्यक्त होत आहेत. त्यामुळेच हे गाणे अनेक यशस्वी महिल्यांच्या यशाचे प्रतिबिंब असल्याचे मत पारुल गुलाटी हिने व्यक्त केले आहे. महिलांना, विशेषतः तरुणींना आणि इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्यासाठी ते महत्त्वाची भूमिका बजावेल, असे तिचे म्हणणे आहे.

गाण्याबद्दल बोलताना ती म्हणाली, 'मर्जी की मालकिन' ही फक्त एक ओळ नाही तर एक घोषणा आहे. प्रत्येक महिलेला स्वतःच्या निवडी, कारकीर्द आणि स्वप्ने स्वीकारण्याचा अधिकार आहे. आम्ही गाण्यातून हाच विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. सुनिधी चौहानसोबत काम करण्याबद्दल पारुल म्हणाली, 'सुनिधीसोबत काम करणे माझ्यासाठी अत्यंत गौरवास्पद आहे. माझ्यासाठी ती नेहमीच एक आदर्श राहिली आहे. तिच्या आवाजात या गाण्याची गरज असणारी एक धग आहे. त्यामुळेच गाणे ऐकणाऱ्या प्रत्येक मुलीमध्ये एक शक्तिशाली विचार प्रज्वलित करण्याचे काम हे गाणे करेल, याचा आम्हाला विश्वास वाटतो.'

एकूणच हे गाणे अशा असंख्य महिलांविषयी थेट भाष्य करते ज्यांना सतत वाट पाहण्यास, तडजोड करण्यास किंवा जुळवून घेण्यास सांगितले गेले आहे. 'हा ट्रॅक शांतपणे स्वतःचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी आहे. मला आशा आहे की ते एखाद्याच्या धाडसी निर्णयाचा साउंडट्रॅक बनेल...' असे म्हणत ती आपल्या भावना व्यक्त करते. थोडक्यात सुनिधीच्या जबरदस्त आवाजामुळे आणि पारुलच्या स्पष्ट दृष्टिकोनामुळे, 'मर्जी की मालकिन' हे गाणे आधीच गाण्यापेक्षा खूप काही जास्त बनले आहे. ही एक चळवळ आहे. त्यामुळेच स्पीकरवरून मोठ्याने वाजत असो किंवा इअरबड्सवरून हळू आवाजात वाजत असो, सक्षम करणारे हे गाणे प्रत्येक श्रोत्याच्या मनाला भिडेल यात शंका नाही.

# धमाल फोटो, खुमासदार व्हिडिओ



'भूल भुलैया ३' नंतर कार्तिक आर्यनने आगामी चित्रपटाची तयारी सुरू केली आहे. अनुराग बसूच्या रोमँटिक ड्रामा व्यतिरिक्त तो समीर विद्वांसच्या चित्रपटावर देखील काम करत आहे. अलीकडेच, त्याने आपले परदेशातील काही मजेशीर फोटो शेअर केले असून ते मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत.

कार्तिक आर्यन सध्या करण जोहर निर्मित 'तू मेरी मैं तेरा तू मेरी' चे शूटिंग करत आहे. त्याचे दिग्दर्शन समीर विद्वांस यांनी केले आहे. याच चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचे फोटो अभिनेत्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

अलिकडेच इंस्टाग्राम स्टोरीवर त्याचे हे बरेच फोटो आणि व्हिडिओ प्रेक्षकांनी पाहिले आणि 'लाईक्स'च्या माध्यमातून पसंतीही नोंदवली. पहिल्या फोटोमध्ये क्रोएशियन भाषेत '२१ जून २०२५ तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' असे लिहिले आहे तर दुसऱ्या व्हिडिओमध्ये कार्तिक बागेत फुटबॉल खेळताना दिसत आहे.

दुसऱ्या एका फोटोमध्ये तो टीमसोबत मजा करताना दिसतोय तर अशाच एका फोटोमध्ये पिझ्झा शॉपवर उभा असून पूर्ण लक्ष पिझ्झावर केंद्रीत केलेल्या कार्तिकची छबी दिसत आहे. एका व्हिडिओमध्ये परदेशी माणूस त्याला 'कार्तिक भैया' म्हणत आहे तर दुसरा एकजण त्याला गाडीत ओढत आहे. आणखी एका व्हिडिओमध्ये तो क्रोएशियन फेस्टमध्ये मजा करत आहे. त्याच्या या सगळ्या मजामस्तीला चाहते लाईक करत आहेत.

स्ट्रीट शॉपिंगची झलक दाखवण्यासोबतच त्याने या ट्रिपमध्ये फुटबॉलचा सरावही केला. तसेच टीमसोबत वेळ घालवल्यानंतर त्याने रेमो डिसूझासोबत एक स्टायलिश फोटो क्लिक केला. इतकेच नव्हे तर क्रोएशियातील झाग्रेबच्या भाजी मार्केटची झलकही त्याने व्हिडिओच्या माध्यमातून दाखवली.

एका मजेशीर व्हिडिओमध्ये तर हा अभिनेता रस्त्याच्या कडेला गाडीत बसून चक्क दाढी करत आहे आणि एक व्यक्ती त्याचा मजेमजेत मेकअप करत आहे. त्याने या गमतीशीर स्लाईडचा शेवट स्वतःच्या शर्टलेस फोटोसह केला आहे. अर्थातच कँपसमध्ये चित्रपटाचे नाव लिहायला तो विसरलेला नाही.

# वाढता वाढता वाढे...



दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद शाहरुखच्या आगामी 'किंग'चे दिग्दर्शन करत असून हा चित्रपट मोठ्या स्टारकास्टमुळे बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. त्यातच आता त्यात एका प्रसिद्ध अभिनेत्याची एन्ट्री होत असल्याची बातमी आहे.

याचा खुलासा स्वतः संबंधित अभिनेत्याने केला असून सांगितले आहे की, शाहरुख खानने त्याला फोन करून या चित्रपटात काम करण्याची ऑफर दिली आहे. याआधी शाहरुख मुलगी सुहानासोबत 'किंग' मध्ये पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर धमाल करणार असल्याची बातमी प्रेक्षकांमध्ये उत्साह निर्माण करून गेली होती. त्यातच आता 'पाताल लोक' वेब सिरीज फेम अभिनेता जयदीप अहलावतने स्वतः आपण 'किंग'चा भाग राहणार असल्याचे सांगितले आहे.

'शाहरुख खान बऱ्याच दिवसांपासून माझ्या नावाचा विचार करत होते. पण दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद थोडे साशंक होते. ही भूमिका छोटी असल्यामुळे माझ्याकडून होकार मिळेल की नाही, याबद्दल शंका होती. मात्र एके दिवशी स्वतः शाहरुख खान यांचा फोन आला. मला तुम्हाशी काही बोलायचे आहे... अशी सुरुवात करत त्यांनी मला ऑफर दिली. आता त्यांच्या शब्द कोण अव्हेरू शकतो?' असे सांगत आपण 'किंग'मध्ये काम करण्यास होकार दिल्याचे या अभिनेत्याने स्पष्ट केले.

थोडक्यात जयदीप अहलावतने स्वतः अधिकृत पुष्टी केल्यामुळे आगामी 'किंग'मध्ये तो छोटी पण महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे. एकूण स्टारकास्टवर नजर टाकली तर अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, दीपिका पदुकोण, सुहाना खान आणि सौरभ शुक्ला असे अनेक कलाकार त्यात महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसतील. आता त्यात जयदीपचे नाव मिसळले गेल्यामुळे वेगळे वजन प्राप्त होईल, असे म्हणावे लागेल.

# मनोरंजनाची मेजवानी

वर्षातील सहावा महिना अखेरच्या टप्प्यात आहे. त्यातच मनोरंजनाच्या दृष्टीने हा शेवटचा आठवडा खूप महत्त्वाचा आणि खास ठरत असल्याने बरीच चहलपहल अनुभवास मिळतीये. ओटीटीपासून थिएटरपर्यंत एकामागून एक वेब सिरीज आणि चित्रपटांचे प्रदर्शन चर्चेत असल्यामुळे प्रेक्षकांना भरपूर चॉईस मिळाला नसता तरच नवल.

जितेंद्र कुमार यांच्या कल्ट क्लासिक वेब सिरीज 'पंचायतच्या सीझन ४' च्या रिलीजची बरीच चर्चा असून



अमेझॉन प्राइम व्हिडिओवर ऑनलाइन स्ट्रीम होत असलेल्या या सिरीजची मोठी हवा पाहायला मिळतीये.

याबरोबर मार्व्हल युनिव्हर्सच्या सुपरहिरो वेब सिरीज 'आयर्न हार्ट'नेही वातावरणनिर्मिती केली आहे. जिओ हॉटस्टारवर प्रेक्षक याचा आनंद घेऊ शकतात. दुसरीकडे सुपरनॅचरल हॉरर थ्रिलर पाहण्याची आवड असणारा काजोलच्या 'मा' कडे आकर्षित होणे स्वाभाविक आहे.

मानसिक थ्रिलर असणारी बंगाली वेब सिरीज 'बिभीषण' ही प्रेक्षकांना रंजक वाटू शकते. प्रेक्षकांना झी फाईव्ह वर त्याचा आनंद घेता येईल. या सगळ्याच्या बरोबरीने सोनाक्षी सिन्हा, अर्जुन रामपाल आणि परेश रावल स्टारर हॉरर थ्रिलर 'निकिता रॉय' देखील बराच चर्चेत आहे.

राम कपूर स्टारर वेब सिरीज 'मिस्ट्री' देखील मनोरंजनास सज्ज असून याद्वारे प्रेक्षकांना अमेरिकन सिरीज 'मोंक' चे हिंदी रूपांतर पाहायला मिळतंय. राम बऱ्याच काळानंतर डिक्टेटर अरमान मिस्त्रीच्या भूमिकेत आपल्या क्षेत्रात परतत असून प्रेक्षक जिओ हॉटस्टारवर त्याचा आनंद लुटू शकतात. बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा अजय देवगण आणि रितेश देशमुख यांचा क्राइम थ्रिलर 'रेड २' ओटीटीवरील प्रेक्षकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरु शकतो. तो नेटफ्लिक्सवर पाहता येईल. एकंदर प्रत्येकाला हवे ते देण्यास मनोरंजनविश्व सिद्ध आहे, हेच खरं.

# कोणाची सरशी?

चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर 'कुबेर' हा क्राइम आणि थ्रिलर चित्रपट थिएटरमध्ये प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. जून २०२१ मध्ये 'कुबेर'ची घोषणा करण्यात आली होती. चित्रीकरण तीन वर्षांनी पूर्ण झाले आणि आता तो हाऊसफुल्लचा बॅनर मिरवत आहे.

हा बॉलिवूडमधील बहुप्रतिक्षित 'सितारे जमीन पर' सोबत मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला खरा तथापि, आमिर खानच्या चित्रपटासमोर धनुषचे आकर्षण किंचितही कमी झालेले दिसले नाही. 'सितारे जमीन पर' ला मागे टाकल्यानंतर 'कुबेरा'ने चांगली कमाई सुरु ठेवली आहे.



हे दोन्ही चित्रपट २० जून रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाले. दोन्ही वेगवेगळ्या शैलीचे आहेत. पहिल्या दिवशी दोन्ही सुपरस्टारमधील संघर्षाचा कमाईवर फारसा परिणाम झाला नाही. 'कुबेरा'ने पहिल्या दिवशी आमिरच्या चित्रपटापेक्षा १४ कोटी रुपये जास्त कमाई केली. दुसऱ्या दिवशीही कलेक्शनही चांगले होते.

धनुष, नागार्जुन आणि रश्मिका मंदाना यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या 'कुबेर'ने दुसऱ्या दिवशी १७.६१ कोटी रुपये कमावले. हे कलेक्शन पहिल्या दिवसापेक्षा १९ टक्के जास्त होते. आठवड्याच्या शेवटीही त्याला फायदा झाला असल्याचे दिसून आले.

अर्थात 'कुबेरा'ने कमाईत उडी मारून सर्वांना आश्चर्यचकित केले असेल, तरी तो 'सितारे जमीन पर'चा दुसऱ्या दिवसाचा विक्रम मोडू शकला नाही. आमिर खानच्या चित्रपटाने दुसऱ्या दिवशी २१.५० कोटी रुपये कमावले.

शेखर कम्मुला दिग्दर्शित 'कुबेर'ची कथा एका भिकाऱ्याभोवती (धनुष) फिरते. तो स्वतःला वाचवण्यासाठी आणि सत्य बाहेर आणण्यासाठी कसा संघर्ष करतो हे चित्रपटात बघायला मिळेल.

# विवेक लागूंचे स्मरण



मराठी मनोरंजन विश्वातील ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांच्या निधनाची दुखद वार्ता अलिकडेच आपण ऐकली. ते दिवंगत ज्येष्ठ अभिनेत्री रीमा लागू यांचे पूर्वाश्रमीचे पती तर अभिनेत्री-लेखिका मृण्मयी लागूचे पिता होते. विवेक यांच्या जाण्याने मराठी मनोरंजन विश्वाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी विविध मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केले होते. मराठीसह हिंदीमध्येही त्यांचे काम गाजले.

त्यांच्या गाजलेल्या कलाकृतींविषयी बोलायचे झाल्यास 'गोदावरीने काय केले' (२००८), 'अग्ली' (२०१३), 'व्हॉट अबाउट सावरकर' (२०१५), '३१ दिवस' (२०१८) इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. तसेच त्यांच्या 'चार दिवस सासूचे', 'हे मन बावरे', 'एका लग्नाची दुसरी गोष्ट' या मालिकाही गाजल्या होत्या.

त्यांची पत्नी रिमा लागू यांचं लग्नाआधीचं नाव नयन बडबडे होतं. रिमा यांनी अभिनय करता करता बँकेत नोकरी केली. तेव्हा कलाकारांसाठी खास कोटा असायचा. बँकांमधील नाटकांच्या स्पर्धांदरम्यान त्यांची आणि विवेक यांची भेट झाली. तेव्हा विवेक २३ वर्षांचे तर रिमा १८ वर्षांच्या होत्या. दोन वर्षांच्या प्रेमानंतर ते १९७८ मध्ये विवाहबंधनात अडकले. पण काही वर्षांनी मतभेद वाढू लागल्याने वेगळे होण्याचा निर्णय घेत त्यांनी घटस्फोट झाला होता. अर्थात घटस्फोटानंतरही रिमा लागू यांनी लग्नानंतरचेच नाव लावले होते.

विवेक लागू यांच्या जाण्याने नक्कीच सर्वांना धक्का बसला आहे. मराठी मनोरंजन विश्व नेहमीच त्यांचे स्मरण ठेवेल.


# 'सिनर्स' येतोय ओटीटीवर

या वर्षी हॉरर शैलीतील 'सिनर्स' प्रदर्शित झाला. त्याची कथा आणि कलाकारांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मने इतकी जिंकली की चित्रपट थिएटरमधून बाहेर पडला तेव्हापासूनच त्याच्या ओटीटी रिलीजची आतुरतेने वाट पाहिली जात होती.

आता अडीच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर, हॉलिवूडमधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक ठरलेला 'सिनर्स' ओटीटीवर प्रदर्शित होत आहे.

रायन कूगलर दिग्दर्शित 'सिनर्स'ने बॉक्स ऑफिसवर खूप चांगली कमाई केली. पण कोणी तो थिएटरमध्ये मिस केला असेल तर आता ओटीटीवर पाहण्याची संधी नक्कीच आहे.

मायकेल बी जॉर्डन, हेली स्टीफेल्ड आणि माइल्स कीटन यांचा 'सिनर्स' १८ एप्रिल रोजी जगभरातील थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. त्याने भारतीय बॉक्स ऑफिसवर तब्बल १० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली तर जगभरात त्याने तीन हजार कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला होता. त्यामुळेच कोविड-१९ नंतर तो सर्वाधिक कमाई करणारा हॉरर शैलीचा चित्रपट ठरला.



अशाप्रकारे बॉक्स ऑफिसवर उत्तम व्यवसाय केल्यानंतर आता त्याला ओटीटीवर कसा प्रतिसाद मिळतो याकडे विश्लेषकांचे लक्ष आहे. तो ४ जुलैपासून 'मॅक्स'वर प्रदर्शित होत आहे. 'सिनर्स' ही दोन जुळ्या भावांची कथा आहे. ते दक्षिण अमेरिकेतून आपल्या गावी परतल्यावर कथा वेगळे वळण घेते. एके दिवशी विचित्र घटना घडू लागतात आणि कथा रोमांचक होत जाते. तेव्हा आता हाच सगळा थरार ओटीटीवर बघा आणि चित्रपटाचा आनंद घ्या.

# कथा रंजक वळणावर

कलर्स मराठी वाहिनीवरील 'आई तुळजाभवानी' या लोकप्रिय मालिकेत असुरीशक्तींच्या वर्चस्वासाठीचा संघर्ष आता अधिक गहिरा होत असून देवी तुळजाभवानीचा शोध घेत माया थेट छोट्या जगदंबाच्या घरी पोहोचणार आहे. गंगाईच्या मांडीवर विसावलेली बाल जगदंबा, शांत मंगलमय वातावरण... पण अचानक तेथे 'माया' या असुरीशक्तीचा प्रवेश होतो आणि वातावरणाला एक भीतीदायक कलाटणी मिळते. तेव्हा प्रेक्षक यात गुंतून जातील, हे वेगळे सांगायला नको.

'ह्यांना तर झोपवलं... आता तुझा काळ जवळ आलाय, तुळजा...' असं म्हणत माया तिची असुरीशक्ति प्रकट करते. मात्र मार्गात अनेक दैवी त्रिशूल उभे राहतात आणि घराभोवती दैवी तेज पसरतं. दरवाजा उघडतो आणि जगदंबा तेजस्वी रूपात समोर येते. यामुळेच संतापून माया जगदंबाला आव्हान देताना म्हणते, 'मी तुला इथून घेऊनच जाणार, मला कमी लेखू नकोस...' मात्र त्यानंतर घडणाऱ्या नाट्यमय घडामोडी आणि जगदंबाने निर्माण केलेले आव्हान



यामुळे पुढे काय होणार याची उत्सुकता निर्माण होते.

आता माया शक्तिशाली रूपात प्रकट झाली आहे. लोभ, क्रोध, मोह, मत्सर, मद आणि माया या षड्रिपूंच्या प्रभावाने आणि त्यांना नियंत्रित केल्याने महिषासुर अधिक बलशाली झाला आहे. यामुळे बाल जगदंबेच्या मार्गातील अडथळे अधिकच वाढताना दिसत आहेत. ही माया केवळ षड्रिपूंतील एक नसून ती संपूर्णसृष्टी उध्वस्त करू शकते. त्यामुळे तिचं बलाढ्य मायावी आव्हान आणि देवीच्या भक्तीचा अद्वितीय प्रवास यांचा संगम येत्या काही भागात पाहायला मिळणार आहे.

# ग्लोबललॉजिकने नागपूरमध्ये स्टेम इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन केले

**नागपूर, २८ जून :** डिजिटलक प्रॉडक्ट इंजिनिअरिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी आणि हिताची समूहाचा भाग असलेल्या ग्लोबललॉजिकने आज नागपूरमधील सी. पी. बेरार हायस्कूल येथे अत्याधुनिक रोबो शिक्षा केंद्र या स्टेम इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन केले. इंडिया स्टेम फाउंडेशनच्या सहकार्याने राबवण्यात आलेली ही योजना, ग्लोबललॉजिकच्या #EducateToEmpower या प्रमुख सीएसआर उपक्रमाचा भाग आहे. या उपक्रमाचा उद्देश वंचित समुदायातील विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) या विषयांमध्ये समान आणि प्रत्यक्ष शिक्षण संधी उपलब्ध करून देत त्यांना सक्षम बनवणे आहे.




कार्यक्रमात बोलताना ग्लोबललॉजिकचे असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट इंजिनिअरिंग अमित काळे म्हणाले, नागपूरमधील ही स्टेम लॅब आमच्या या विश्वासाचे प्रतीक आहे की खरी परिवर्तनाची सुरुवात प्रवेशापासून होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञान आणि अनुभवाधिष्ठित शिक्षणाच्या संधींपर्यंतचा संधींपर्यंत सहज पोहोच मिळाल्यानेच खरा बदल घडतो. या भागातील तरुणांमध्ये आम्हाला अपार क्षमता दिसते आणि या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, कौतुकाची भावना आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत, कारण हेच विद्यार्थी आपल्या डिजिटल भविष्यातील शिल्पकार ठरणार आहेत.

ग्लोबललॉजिकच्या सीएसआर प्रमुख (एपीएसी) मोनिका वालिया म्हणाल्या, ही स्टेम इनोव्हेशन लॅब केवळ एक जागा नाही, तर ही सर्जनशीलता, नवोपक्रम आणि समान शैक्षणिक संधींचे प्रवेशद्वार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या चार विषयांच्या समन्वयातून, आम्ही अशा समुदायांतील दडलेल्या प्रतिभेला चालना देत आहोत, जिथे संधी कमी असते. हा उपक्रम आमच्या सामाजिक प्रभावाच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रतीक आहे आणि विविध कल्पनांनी आणि असीम शक्यतांनी भरलेले भविष्य घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

सुधांशु शर्मा संस्थापक व संचालक, इंडिया स्टेम फाउंडेशन यांनी सांगितले, ग्लोबललॉजिकसोबतची ही भागीदारी भारतात स्टेम शिक्षण सर्वांसाठी सहज उपलब्ध, आकर्षक आणि परिणामकारक बनवण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. सीएसआर उपक्रमाद्वारे भविष्यकालीन कौशल्यांनी सज्ज मनुष्यबळ घडवण्याबाबत त्यांची वचनबद्धता केवळ रोबो शिक्षण केंद्र उपक्रमाला बळकट करते असे नाही, तर तर पुढच्या पिढीतील नवोपक्रमशील विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या आमच्या सामायिक दृष्टीकोनालाही आधार देते. ग्लोबललॉजिकच्या सहकार्यामुळे, आम्ही आमचे प्रयत्न अधिक व्यापक स्तरावर राबवू शकतो आणि भविष्यातील तंत्रज्ञान व समाज घडवणाऱ्या तरुण बुद्धीमत्तेला योग्य प्रकारे घडवू शकतो.

या स्टेम लॅबच्या सुरूवातीमुळे भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) च्या दृष्टीकोनाशीही सुसंगती निर्माण होते, जे शालेय अभ्यासक्रमात स्टेम विषयांचा समावेश करण्यास प्रोत्साहन देते, प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणाला चालना देते आणि चिंतनशील विचार व समस्या सोडवण्याच्या क्षमतेच्या विकासास पाठिंबा देते. शिक्षण क्षेत्रातील ग्लोबललॉजिकचा सातत्यपूर्ण सहभाग हा भारतातील प्रत्येक भागात भविष्यकालीन पिढी घडवण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे ज्याची सुरुवात शालेय स्तरापासून होते.

# जेनेरालीने आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया हा त्यांचा भारतातील नवा जॉइंट व्हेंचर भागीदार असल्याची केली घोषणा

**नवी दिल्ली, २८ जून :** जेनेरालीने आज सेंट्रल बँक ऑफ इंडियाला (सीबीआय) भारतातील आपला नव्या संयुक्त भागीदार (जॉइंट व्हेंचर पार्टनर) म्हणून घोषित केले. सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही १९११ मध्ये स्थापन झालेली भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात जुन्या बँकांपैकी एक आहे. या बँकेचे मार्केट कॅपिटलायझेशन ४६१ अब्ज (५.१ अब्ज युरो) इतके आहे आणि ४,५००हून अधिक शाखांच्या माध्यमातून ही बँक ८० दशलक्षांहून अधिक ग्राहकांना सेवा देते.

सीबीआयसोबतच्या या भागीदारीमुळे जेनेरालीचे मार्केटमधील अस्तित्व भक्कम होईल आणि जीवन विमा व पीअँडसी या दोन्ही विभागांमधील त्यांचे ब्रँड पोझिशनिंग व वितरण क्षमता मजबूत होईल.

जेनेराली ग्रुपच्या इन्श्युरन्स विभागाचे डेप्युटी सीईओ जेमी अँकुस्तेगी म्हणाले, भारतातील आमच्या व्यवसायाच्या या नव्या पर्वाची सुरुवात सेंट्रल बँक ऑफ इंडियासोबत करत असल्याचा आम्हाला आनंद आहे. ही बँक स्थानिक पातळीवर एक मजबूत आणि प्रतिष्ठित भागीदार आहे. भारतासारख्या प्रचंड शक्यता असलेल्या बाजारपेठेत जेनेरालीचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी ही भागीदारी निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी आम्हाला खात्री आहे. या वाटचालीमुळे आमच्या लाइफटाइम पार्टनर २७ : ड्रायव्हिंग एक्सलन्स या धोरणाशी सुसंगत असून, निवडक प्रमुख भौगोलिक भागांमध्ये आमच्या मुख्य क्षमतांवर लक्ष केंद्रित करून वाढीचा पाठपुरावा करण्यात आम्हाला मदत होईल.

जेनेराली ग्रुपचे एशिया रिजनल ऑफिसर रॉब लिओनार्डी म्हणाले, ही भागीदारी भारतातील आमच्या व्यवसायावर असलेल्या दृढ विश्वासाचे प्रतीक आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियासोबत काम करण्याची ही संधी जेनेरालीसाठी या महत्त्वाच्या वाढीच्या बाजारपेठेत एकेक पाऊल पुढे टाकत भक्कम वाटचाल करण्याची आहे. तसेच आमच्या नवीन स्ट्रॅटेजिक प्लॅनच्या लाँचनंतर या भागीदारीसाठी ही वेळ योग्य आहे. आमच्या एकत्रित बलस्थानांमुळे 'लाइफटाइम पार्टनर' या आमच्या संकल्पनेला नव्या उंचीवर नेण्याची क्षमता आहे. यात चांगली ब्रँड ओळख निर्माण करणे आणि अधिक मजबूत वितरण व्यवस्था तयार करणे समाविष्ट असून याला आमच्या भक्कम धोरणांचे पाठबळ लाभले आहे.

### 'जागो इंडिया जागो फिटनेस अभियान' ला एक वर्ष पूर्ण

# नागपूर १७ व्या शहरात पोहोचले, ४ दिवसांच्या फिटनेस ड्राइव्हचे आयोजन



**नागपूर, २८ जून :** सुप्रसिद्ध फिटनेस आणि स्लिमिंग सेंटर, सौमेन वर्कआउट (नो मशीन झोन) ने त्यांच्या देशव्यापी मोहिमेचा पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. देशातील वाढत्या लठ्ठपणाच्या समस्येवर मात करण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यासाठी भारतीयांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने १ मार्च २०२४ रोजी ही मोहीम सुरू करण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत, नागपूर शहरात २६ ते २९ एप्रिल दरम्यान ४ दिवसांचा फिटनेस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये शहरातील प्रमुख उद्याने आणि उद्याने समाविष्ट होती:

जॉगर्स पार्क, जपानी बाग, शिवाजीनगर गार्डन, राजीव गांधी पार्क, धरमपेठ येथील धंतोली उद्यान

या मोहिमेचा एकमेव उद्देश होता लठ्ठपणाशी लढा देणे आणि भारताला फिटनेस-जागरूक राष्ट्रात रूपांतरित करणे. देशात लठ्ठपणाचे प्रमाण वाढत असताना, सर्व वयोगटातील लोकांना त्यांच्या जीवनशैलीचा भाग फिटनेस बनवण्यासाठी शिक्षित आणि सक्षम करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला.

गेल्या एका वर्षात, ही मोहीम कोलकाता, दिल्ली, जयपूर, मुंबई, हैदराबाद, बेंगळुरू, भुवनेश्वर, जमशेदपूर, चेन्नई, गुवाहाटी, गोवा, अहमदाबाद, अमृतसर यासह १५ हून अधिक प्रमुख शहरांमध्ये पोहोचली आणि हजारो लोकांनी यात सहभाग घेतला. ५ वर्षांच्या लहान मुलांपासून ते ९० वर्षांच्या मोठ्यांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या फिटनेस सत्रांमध्ये, वैयक्तिकृत वर्कआउट्समध्ये आणि प्रेरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

सौमेन वर्कआउटचे मालक सौमेन दास यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले, जागो इंडिया जागो फिटनेस अभियान'चा हा एक वर्षाचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांना एकत्र येताना पाहिले आहे एकाच संदेशासह सर्वांसाठी फिटनेस. १३ वर्षांच्या मुलाला आरोग्याकडे पहिले पाऊल टाकताना किंवा ९० वर्षांच्या वृद्धाला दररोज व्यायाम करून सामाजिक वर्ज्ये तोडताना पाहणे अत्यंत हृदयस्पर्शी आहे. आम्ही केवळ शारीरिक आरोग्यातच नव्हे तर मानसिकतेतही क्रांती घडवत आहोत आणि ही फक्त सुरुवात आहे.

जनतेकडून मिळालेल्या प्रचंड पाठिंब्यामुळे, ही मोहीम अधिक शहरांमध्ये विस्तारित करण्याची आणि सामुदायिक आरोग्य उपक्रमांना बळकटी देण्याची योजना आहे.

'जागो इंडिया जागो फिटनेस कॅम्पेन'च्या यशाने देशातील आरोग्याविषयी वाढती जागरूकता आणि उत्साह अधोरेखित केला आहे. सौमेन वर्कआउटच्या या जोरदार प्रयत्नामुळे प्रत्येक भारतीय आपल्या आरोग्याबद्दल जागरूक झाला आहे आणि फिटनेसला जीवनातील एक आवश्यक सवय बनवली आहे. ही मोहीम प्रत्येक वयोगटातील शक्ती आणि आत्मविश्वासाचा उत्सव आहे निरोगी भारताच्या दिशेने एक शक्तिशाली पाऊल.

# सॅमसंगकडून भारतात २०२५ बीस्पोक एआय अप्लायन्सेस लाँच



**नागपूर, २८ जून :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज आपली २०२५ बीस्पोक एआय अप्लायन्स लाइनअप लाँच केली. ही लाइनअप चार विशिष्ट ग्राहक फायद्यांवर डिझाइन करण्यात आली आहे: ईजी, केअर, सेव्ह आणि सेक्युअर, ज्यामुळे एआयसह तुमचे जीवन उत्साहवर्धक व आनंददायी होते. या अनुभवांना सॅमसंगचे नवीन एआय होम स्क्रिन इंटरफेस, बिक्स्बी वॉईस असिस्टण्टसह द्विमार्गी नैसर्गिक कम्युनिकेशन, सॅमसंग नॉक्स सिक्युरिटी आणि विनासायास स्मार्टथिंग्ज कनेक्टीव्हीटीचे पाठबळ आहे, ज्यामधून भारतातील आधुनिक कुटुंबांना अत्यंत वैयक्तिकृत, ऊर्जा कार्यक्षम आणि सुरक्षित स्मार्ट होम सोल्यूशन्स मिळतात.

''आम्हाला भारतात २०२५ बीस्पोक एआय डिजिटल अप्लायन्सेस लाइन-अप लाँच करण्याचा आनंद होत आहे, जेथे नाविन्यता आणि उद्देशाला एकत्र करण्यात आले आहे. ही फक्त स्मार्ट अप्लायन्सेस नसून भारतातील कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली सर्वोत्तम सोबती आहेत,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले.

''आम्हाला विश्वास आहे की, आमचे बीस्पोक एआय अप्लायन्सेस भारतातील आधुनिक कुटुंबांच्या अप्लायन्सेस वापरामध्ये क्रांती घडवून आणतील, ज्यामुळे ग्राहक सर्वोत्तम स्मार्ट होम राहणीमानाचा अनुभव घेऊ शकतील,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेस बिझनेसचे उपाध्यक्ष गुफरान आलम म्हणाले.

या नवीन लाँचमधील सर्वोत्तम अप्लायन्स आहे बीस्पोक एआय लॉण्ड्री कॉम्बो ऑल-इन-वन, जी घरातील जागा वाचवणारी, उच्च क्षमतेची, ऑल-इन-वन वॉशिंग मशिन आहे आणि एकाच युनिटमध्ये कपडे धुण्यासोबत सुकवले जातात. यामुळे मशिन्समध्ये कपडे हस्तांतरित करण्याचा त्रास दूर होतो, परिणामत: वापरकर्त्यांचा वेळ वाचतो आणि कपडे धुतल्यानंतर कपड्यांना वास येण्याला प्रतिबंध होतो. एआय वॉश अँड ड्राय असलेले बीस्पोक एआय लॉण्ड्री कॉम्बो लॉण्ड्रीचे वजन, कपड्याचा प्रकार आणि कपड्यावरील डागांना ओळखते, आपोआपपणे प्रत्येक लोडसाठी पाणी, डिटर्जंट, वॉश टाइम आणि ड्राइंग स्थितींना समायोजित करते. यामधून कपडे उत्तमप्रकारे स्वच्छ धुतले जाण्याची आणि वैयक्तिकृत लॉण्ड्री अनुभवाची खात्री मिळते.

# Save Earth Mission ने अहमदाबाद येथे ग्लोबल व्हिजन अनव्हीलिंग कार्यक्रमाची केली भव्य घोषणा

**अहमदाबाद, २८जून :** 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत अवघ्या १ तासात ५ लाखांहून अधिक झाडे लावून, Save Earth Mission ने हवामान बदलाविरुद्ध ऐतिहासिक पाऊल उचलले आणि जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. या जागतिक विक्रम-निर्मिती कार्यक्रमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक झाले आणि Forbes, Fox, Business Insider, तसेच इतर प्रमुख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांवर प्रमुखतेने प्रसिद्ध झाले.आता, Save Earth Mission जागतिक स्तरावर आपली उपस्थिती नोंदवण्यासाठी सज्ज आहे.संस्थेने आपल्या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रम Save Earth Mission Global Vision Unveiling ह्याची अधिकृत घोषणा केली आहे. हा कार्यक्रम Save Earth Mission च्या जागतिक रणनीतीच्या सुरुवातीचे प्रतीक आहे, ज्याचा उद्देश २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावणे आणि पृथ्वीला नेट झीरो कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने नेणे आहे.हा ऐतिहासिक कार्यक्रम ३ जुलाई २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता IST, प्रतिष्ठित GIFT City Club, अहमदाबाद येथे आयोजित केला जाईल. ही जागतिक घोषणा Save Earth Mission च्या प्रवासातील एक मोठे आणि निर्णायक पाऊल आहे. हे एक असे व्यासपीठ आहे जिथे संस्था आपला विस्तारित रोडमॅप सादर करेल आणि आंतरराष्ट्रीय चॅप्टर्सना एकत्रित करून हवामान संरक्षणाच्या सामायिक ध्येयाकडे प्रेरित करेल. या कार्यक्रमात Save Earth Mission च्या जागतिक नेटवर्कमधील नेते, प्रतिनिधी आणि स्वयंसेवक सहभागी होतील, जे देशनिहाय वृक्षारोपण मोहिमा, नवीन भागीदारी आणि जलद गतीने पुनर्वनीकरणाच्या प्रयत्नांची



पायाभरणी करतील.

कार्यक्रमाच्या ठिकाणाची निवड जागतिक सार्वजनिक मतदान प्रक्रियेद्वारे केली गेली, ज्यामध्ये अबू धाबी, दुबई, गोवा, बँकॉक आणि अहमदाबाद यासारख्या शहरांचा पर्याय म्हणून समावेश होता. सर्वाधिक मते मिळवून अहमदाबादची निवड झाली, ज्याने भारताला या जागतिक हवामान क्रांतीच्या पुढील टप्प्याचे केंद्र बनवले.

Save Earth Mission भारत चॅप्टरचे अध्यक्ष संदीप चौधरी म्हणाले की हा केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी अभिमानाचा क्षण आहे. लोकांनी आपला आवाज उठवला आणि अहमदाबादने जागतिक हवामान एकतेचे प्रतीक बनून एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. ग्लोबल व्हिजन अनव्हीलिंग कार्यक्रमात मी Save Earth Mission चा जागतिक रोडमॅप सादर करेन, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय वृक्षारोपण मोहिमा, सीमापार सहयोग आणि नागरिक, कॉर्पोरेट्स आणि सरकारांना एकत्र जोडून २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावण्याच्या मिशनला पूर्ण करण्याची योजना असेल.

# श्री सिद्धिविनायक मंदिर न्यास आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा






**मुंबई, २८ जून :** महासागर प्रतिनिधी. श्री. सिद्धिविनायक मंदिर न्यासा तर्फे मंदिर परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन दिनांक रोजी अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर न्यासाचे अध्यक्ष आमदार मा. सदा सरवणकर यांच्या अधिपत्याखाली चाललेल्या या मंदिरात नवनवीन उपक्रम राबवत असतात यावेळी मंदिरातील सर्व कर्मचारी, अधिकारी, कार्यकारी अधिकारी सौ. विना पाटील, कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, उपकार्यकारी अधिकारी संदीप राठोड, यांनी सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना कोषाध्यक्ष त्रिपाठींनी योगाने शरीराला व मनाला ताकदवर ठेवण्यास व स्फूर्ती ठेवण्यास मदत होते. असे यावेळी गौरवउद्गार काढले.

# निकोबारच्या २४ वे स्टोअरचे रायपूरमधील झोरा मॉलमध्ये उदघाट्न!

**नागपूर, २८ जून :** संथ जीवनशैली आणि आधुनिक भारतीय सौंदर्यशास्त्रावर आधारित डिझाईन-फर्स्ट ब्रँड निकोबारने छत्तीसगडमधील रायपूरमधील झोरा मॉलमध्ये आपले २४ वे स्टोअर उघडले. १,४०९ चौरस फूट पसरलेले हे ठिकाण निकोबारच्या विचारशील जीवनशैली नवीन प्रेक्षकांना हस्तकला, आराम आणि जाणीवपूर्वक निवडींना महत्त्व देण्याची संधी देते.




पती-पत्नी सिमरन लाल राय आणि राऊल राय,यांच्या संकल्पनेतून, निकोबारची स्थापना समकालीन जगासाठी भारतीय जीवनशैलीची पुनर्व्याख्या करण्याच्या हेतूने आणि सहज, पायाभूत आणि सुंदरपणे बनविण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत, ब्रँडने जागरूक खरेदीदारांचा एक समुदाय तयार केला असून तरल कपडे, क्युरेटेड होमवेअर आणि वेगवेगळ्या प्रवासासाठीचे कपडे अश्या वस्तूंकडे आकर्षित होतो. संस्कृती आणि कारागिरीमध्ये रुजलेल्या सामायिक डिझाइन भाषेने सर्वजण एकत्रित आहेत.

निकोबार येथील सी.ई.ओ राशी सेठिया म्हणतात, निकोबारमध्ये, प्रत्येक नवीन बेट (स्टोअर) ही आमची मुळे खोलवर नेण्याच्या दिशेने एक पाऊल आहे आणि आमची पोहोच वाढवते. रायपूर, त्याच्या मजबूत सांस्कृतिक कणा आणि नवीन युगाच्या उर्जेसह, आम्ही भारतासाठी डिझाइन करतो, जागरूक, अभिव्यक्तीशील आणि पायाभूत गोष्टींचे त्याचे प्रतिनिधित्व करतो. या चैतन्यशील आणि विकसित होत असलेल्या शहरात आमचे डिझाइन आणि जागरूक राहणीमान आणण्यास आम्ही उत्सुक आहोत.

स्टोअरचा पत्ता: युनिट क्रमांक यूजी-०२६, वरचा तळमजला, झोरा द मॉल, कृषी महाविद्यालयासमोर, रायपूर ४९२०१२

# रणविजय सिंघा झी टीव्हीवरील छोरियाँ चली गाव या शो चे सूत्रसंचालन करणार

**मुंबई, २८ जून :** भारताच्या विविधतेचा आणि भावनिक सखोलपणाचा उत्सव साजरा करणाऱ्या वेगळ्या नॉन-फिक्शन फॉरमॅटच्या परंपरेला पुढे नेत झी टीव्ही वाहिनी छोरियाँ चली गाव या शो ची सुरुवात करण्यासाठी सज्ज आहे. हा ताज्या दमाचा आणि खास रिॲलिटी शो इंडिया आणि भारत या दोन जगांना एकत्र आणतो. आपका अपना झी या नवीन ब्रँड ओळखीअंतर्गत हा शो प्रेक्षकांना परिवर्तन, सांस्कृतिक एकरूपता आणि मानवी नात्यांच्या हृदयस्पर्शी प्रवासावर घेऊन जाण्याचे वचन देतो.

या कार्यक्रमात १२ स्वयंसिद्ध शहरी महिला त्यांचे आरामदायक आणि जलदगती शहरी जीवन सोडून ६० पेक्षा अधिक दिवस भारतीय ग्रामीण भागात घालवतील. कुठल्याही गॅजेट्स, आरामदायक गोष्टी किंवा शॉर्टकट्स न वापरता, त्या खऱ्याखुऱ्या गावातली कामे करतील, दैनंदिन जीवनात सहभागी होतील आणि वर्षानुवर्षांच्या परंपरांची साधेपणा आणि शहाणपण अंगीकारतील. शोची कथा तीन मजबूत स्तंभांवर आधारित आहे. या फॉरमॅटमध्ये खरी भावना आणि ऊब आणत आहे टीव्हीवरील तरुण आणि लोकप्रिय चेहरा रणविजय सिंघा, जो या शोमध्ये सूत्रसंचालक म्हणून सामील झाला आहे. मात्र तो फक्त सूत्रसंचालक नाही, तर मार्गदर्शक, प्रोत्साहक, कथाकथन करणारा आणि गावकऱ्यांचा आवाजही असेल. भारताच्या खऱ्या रूपाशी असलेल्या त्याच्या नात्यामुळे तो स्पर्धकांचे आणि प्रेक्षकांचे योग्य नेतृत्व करू शकतो.



या शोबाबत रणविजय म्हणाला, जेव्हा मी छोरियाँ चली गावच्या संकल्पनेबद्दल ऐकलं, तेव्हा मला लगेचच ती जबरदस्त वाटली. कारण मी स्वत: अशा व्यक्तींपैकी आहे, ज्यांनी शहरी जीवनाच्या सुविधा अनुभवल्या आहेत पण गावाकडच्या मातीशीही माझं घट्ट नातं आहे. या फॉरमॅटने माझ्यासोबत वैयक्तिक पातळीवर संवाद साधला. हा इतर रिॲलिटी शोसारखा नाही, तर हा एक प्रवास आहे जो मानसिकतेत बदल घडवतो. जेव्हा आजच्या जलद समाधानाच्या जगात सगळं काही एका क्लिकवर मिळतं, तिथं हा शो त्या सगळ्या गोष्टींना आव्हान देतो. स्पर्धक प्रत्यक्षात कष्ट करून जेवण मिळवण्याचा खरा अर्थ समजतील. या सगळ्या अनुभवातून एक खरा बदल, साधेपणा आणि काहीतरी वेगळं पाहण्याची संधी मिळते. छोरियाँ चली गाव लवकरच प्रीमियरसाठी सज्ज आहे आणि प्रेक्षक पाहणार आहेत ग्रामीण जीवनाचं खरंखुरं दर्शन, खरी भावना आणि त्यामागचे खरे सामर्थ्य, जेव्हा १२ महिला रणविजयसोबत आपल्या सवयींच्या दुनियेबाहेर पाऊल टाकतील.

## राशीभविष्य

**मेष :** राजकीय पद आणि प्रतिष्ठा वाढेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील. परदेश दौजयावर जाण्याची शक्यता असेल. कुटुंबात काही शुभ कार्य घडेल.

**वृषभ :** आजचा दिवस आनंदाची बातमी घेऊन येईल. जे चांगल्या नोकरीच्या शोधात आहेत. त्यांना यश मिळेल. तुमचे आरोग्य ठीक राहील. कुटुंबात शुभ कार्याचे योग बनतील. परस्पर मतभेद दूर होतील.

**मिथुन :** वाहन वापरताना काळजी घ्या. काळजीपूर्वक विचार करून कोणतेही नवीन काम करा. विरोधक राजकारणात सक्रिय राहतील. नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नांमध्ये अडथळा येऊ शकतो.

**कर्क :** कोणताही कौटुंबिक वाद गंभीर वळण घेऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. लांबचा प्रवास किंवा परदेश दौरा टाळा. अन्यथा प्रवासादरम्यान तुम्हाला अडचणी येऊ शकतात.

**सिंह :** आजचा दिवस धावपळीचा असेल. तुमचे मन अशांत राहू शकते. तब्येत बिघडू शकते. व्यवसायात संयमाने निर्णय घ्या. कारण एखादी मोठी डील हातातून निसटण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आजचा दिवस चांगला राहील. तुमचे एखादे अडलेले जुने काम पूर्ण होईल. ज्यामुळे मनात प्रसन्नता राहील. कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. आरोग्यात चढ-उतार राहतील. व्यवसायातही लाभाचे योग आहेत.

**तुळ :** व्यवसाय थोडा मंदावेल. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल आणि धैर्य वाढेल. आज, वरिष्ठ अधिकाजयांशी तुमची जवळीक वाढेल. राजकारणात तुमचे वर्चस्व वाढेल.

**वृश्चिक :** आज तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील. नोकरीत पदोन्नतीसह तुम्हाला महत्त्वाची जबाबदारी मिळेल. अपेक्षित यश न मिळाल्याने तुम्हाला दु:ख वाटू शकते.


**धनु :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. तुमच्या तब्येतीची काळजी घ्या. आज विरोधकांपासून सावध रहा. व्यवसायात मोठा धोका पत्करू नका, कारण नुकसानीची शक्यता आहे.

**मकर :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी नवीन मित्र मिळतील. व्यवसायात प्रगती होईल आणि आर्थिक लाभही होईल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. लग्नाशी संबंधित कामात तुम्ही अधिक व्यस्त असाल.

**कुंभ :** व्यवसायात एखादा मोठा करार किंवा निकाल तुमच्या बाजूने होऊ शकतो. तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. तुम्ही कुटुंबासोबत धार्मिक यात्रेला जाऊ शकता. कुटुंबात वाद निर्माण झाल्यास शांत रहा.

**मीन :** तुम्हाला नवीन कपडे आणि भेटवस्तू मिळतील. तुम्हाला शुभ कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. प्रवासाचे कार्यक्रम आनंददायी असतील. कुटुंबात पत्नीसोबत मतभेद होऊ शकतात.

## शब्दकोडे क्रमांक २१४९



**आडवे शब्द :-**
१) शिक्षक
६) फुरसत, अंगात येणे
९) फणसाचा एक प्रकार
१०) एक चतुर्थांश भाग
११) लग्नकार्यासाठी जमलेली मंडळी
१२) संरक्षण खात्याचा कारभार पाहणारा मंत्री
१४) सावली
१५) बोलाविणे
१७) आवडता, प्रिय
१९) हत्यार, उपकरण,
२०) एक अत्तर, एका हिंदी चित्रपटाचे नाव
२१) रविवार
२३) रोखलेली नजर
२४) सध्या
२५) संताप
२७) रस्ता
२८) राखणदार
३०) ऐन, बहर, उणीव भरुन काढणारी गोष्ट
३१) नावाचा जयघोष
३४) माळ धारण करणारा
३७) अंत:करण
३९) धन, ममता
४०) गुजराती नृत्यप्रकार
४३) गळ्यामागचा अवयव
४४) सारखा
४६) ओरखडा
४७) अति उंचावरून फिरणारा पक्षी
४८) वागणूक
४९) कार्य
५०) शपथ
५१) दौत, लेखणी ठेवण्याची लहानशी पेटी
५३) केस कापणे
५५) किंमत
५६) एका बाजूस झुकणे
५७) कसदार
५९) रसाळ
६१) चेहेऱ्यावरील तेज, कांती
६४) मनाचा झालेला ग्रह
६६) गाई-बैलांची चघळत, सावकाश खाण्याची क्रिया
६८) श्रीविष्णू, कमळाचे तळे
७०) प्रजा
७१) कुंभाराची भट्टी
७३) मार्ग
७४) जोरजोराने हसणे
७६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
७८) एक नाजूक सुगंधी फूल,
७९) मृत्यू नसलेला
८०) मुस्लीमांचा उपवासाचा महिना
८१) शरम

**उभे शब्द :-**
२) भारतीय चलन
३) प्राण
४) दार
५) होम, यज्ञात आहुति टाकणे
६) *** **** गाढवाचे पाय धरी (म्हण)
७) मंत्रीमंडळ
८) राख,
९) कागद, कापड कापण्याचे साधन
१३) शनिवार
१४) शोभिवंत, चांगला, फक्कड
१५) *** जावक
१६) एक उद्गार शिव! शिव!
१८) विरोध, प्रतिबंध
१९) तर्क, अंदाज
२२) खुंट, आचळ
२६) हत्ती
२९) माफी मागणारा
३१) एखाद्यास अति आग्रह करून एखादे कार्य करण्यास लावणे (वा.प्र.)
३२) संगीतातील एक राग
३३) कर्णेंद्रिय
३५) मडके
३६) महान
३८) आईचा भाऊ
४१) उष्ण
४२) शुद्ध सोने
४३) मनुष्य जात
४४) विषमच्या विरुद्ध
४५) मऊ
४९) लोखंड गुळगुळीत करण्याचे हत्यार
५०) सूर्याचे एक नाव
५१) चिवचिवाट, आवाजांचा गोंधळ
५२) सेवक
५४) पुन्हा
५५) राक्षस
५८) शहाणा, सुज्ञ, हुषार
६०) सदोदित, एकसारखे
६२) हिमालयातील एक प्राणी
६३) संगीतातील सताल रचना
६५) एक इंग्रजी महिना, निबर
६७) चेष्टा,
६९) महिलांची छेड काढणारा
७१) चेहरा, मुख
७२) मत्स्य
७५) किंमत, प्रत्येक
७६) बकरी
७७) वर्ष, सन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सोन्या तू अजून शुद्धीवर नाही का?

### गुलाबराव पाटलांचा राऊतांना टोला



**मुंबई :** मराठी ही आमची भाषा आहे आणि आम्ही ते मान्य करतो. मात्र, विषय केवळ हिंदीचा आहे. हिंदीच्या बाबतीत सामूहिक निर्णय झाला पाहिजे, अशीच सर्वांची इच्छा आहे. असे परखड मत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी संजय राऊत यांच्यावर देखील जोरदार हल्ला चढवला. 'सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का?' असा प्रतिप्रश्न गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांना विचारला आहे.

राज्यात हिंदीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येऊन मोर्चा काढणार आहेत. या मोर्चा संदर्भात बोलताना संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोणत्या बंकर मध्ये लपून बसले आहेत? अशी बोचरी टीका केली होती. त्याला मंत्री गुलाबराव पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे हे तुज्या छाताडावर बसलेले आहेत, सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का? अशा शब्दात गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे.

राज आणि उद्धव ठाकरे पुढील काळात एकत्र येतील का? या प्रश्नावर देखील गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जाला-त्याला स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी देवाने दिली आहे. शेवटी कोणी काय निर्णय घ्यावा? हा त्या पक्षप्रमुखांचा विषय आहे. ते दोन्ही पक्षप्रमुख आहेत. ते जो निर्णय घेतील, तो घेतील, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.

## कांदा ब्रँडचे मार्केटिंग करणार

### पणनमंत्री रावल यांची घोषणा



**नाशिक :** कांद्याचे सतत बदलते दर ही उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या आहे. मात्र देशातील बाजारात चव आणि दर्जा यामुळे नाशिक कांदा हा ब्रँड तयार झाला आहे. दराच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय म्हणून पणन विभागातर्फे त्याचे देशातील बाजारपेठेत मार्केटिंग करण्यात येईल. सोबतच नाशकात इंटरनॅशनल फूड मार्केट उभारणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्री रावल म्हणाले की, नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष, बेदाणा, येवल्याची पैठणी यांचेही मार्केटिंग केले जाईल. कुंभमेळा ही पर्यटनासाठी सर्वात चांगील संधी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी त्र्यंबकेश्वर-शिर्डी-शनि शिंगणापूर सर्किट विकसित करण्याचा प्रयत्न मी केला. नाशिक-इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या पर्यटन त्रिकोणाबाबतही विद्यमान पर्यटन मंत्र्यांशी चर्चा केली जाईल,

## विरोधकांचे मराठीवर पुतना मावशीचे प्रेम

### केशव उपाध्ये यांची टीका



**मुंबई :** महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या मुद्यावरून मोठे रणकंदन माजले आहे. राज व उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारच्या विरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्याला सर्वच स्तरातून पाठिंबा मिळत असताना भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी विरोधकांचे मराठीवर पुतना मावशीचे प्रेम असल्याचा आरोप केला. या प्रकरणी त्यांनी उद्धव ठाकरे व शरद पवार गटावर सडकून टीका केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुखर उद्धव ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना हिंदीची सक्ती करणाऱ्या अध्यादेशाची होळी करण्याचे आदेश दिलेत. या पार्श्वभूमीवर केशव उपाध्ये यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांचे हे मराठी प्रेम पुतना मावशीच्या प्रेमासारखे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केशव उपाध्ये आपल्या एका पोस्टमध्ये म्हणतात, हे तर पुतना मावशीचे प्रेम! उद्धव ठाकरे यांनी मराठी सक्तीच्या अध्यादेशाची होळी करण्याचा आदेश दिला आहे, मराठी सक्ती सांगणाऱ्या जीआरची होळी? हे यांचं मराठी प्रेम? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना उर्दू भवनची घोषणा केली, त्यावेळी मराठी शाळांच्या दुरावस्थेची आठवण आली नाही? मुंबई महापालिकेच्या मराठी शाळांची संख्या गेल्या १५ वर्षात ४०० वरून २८० पर्यंत खाली आली. याच शाळांतील विद्यार्थी संख्याही लाखांहून ३५ हजारांवर आली. काही शाळा बंद कराव्या लागत आहेत. कुठे गेलं उद्धव ठाकरे यांचं मराठी प्रेम? असा सवाल उपाध्ये यांनी उपस्थित केला आहे.

# 'मराठी'साठी २० वर्षांनंतर दोघे भाऊ एकत्र

### नांदगावकर, संजय राऊत यांच्याकडे नियोजन : सरदेसाई, संदीप देशपांडेंकडेही जबाबदारी



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८ :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र मोर्चा काढणार असून त्याला राज्यातील सर्वच विरोधी पक्षांनी पाठिंबा दर्शवला आहे. आता या मोर्चाच्या नियोजनासाठी मनसेच्या वतीने बाळा नांदगावकर तर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने संजय राऊत यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्याबरोबरच आमदार वरुण सरदेसाई, आणि संदीप देशपांडे यांच्यावर देखील महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.

महाराष्ट्र सरकारच्या वतीने त्रिभाषा सुत्राच्या माध्यमातून हिंदी सक्ती करण्यात येत असल्याचा आरोप ठाकरे बंधूंनी केला आहे. या विरोधात आता एकत्र मोर्चा काढण्यात येणार आहे. ५ जुलै रोजी काढण्यात येणाऱ्या या मोर्चाची जबाबदारी मनसेच्या वतीने ज्येष्ठ नेते बाळ नांदगावकर तर शिवसेनेच्या वतीने संजय राऊत यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

याबरोबरच आमदार वरुण सरदेसाई आणि मनसेचे नेते संदीप देशपांडे यांच्यावर देखील मोर्चाच्या नियोजनाची महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल तर केवळ मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांचा हा मोर्चा असेल, असे मनसेने आधीच जाहीर केले आहे.

वास्तविक राज ठाकरे यांनी केलेला नियोजनानुसार गिरगाव चौपाटीपासून आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा असणार आहे. मात्र उद्धव ठाकरे यांनी हुतात्मा स्मारक ते आझाद मैदान मोर्चा काढावा, असे सुचवले आहे. त्यामुळे आता या मोर्चाच्या मार्गावरुन आणि वेळे वरून अद्याप एकमत झालेले नाही.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने कोणत्याही आंदोलनाची सुरुवात ही हुतात्मा चौकातूनच केली जाते. त्यामुळे आता राज ठाकरे आपला मार्ग बदलणार की, उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या नियोजनाप्रमाणे गिरगाव चौपाटीपासून सुरू होणा ?या मोर्चात सहभागी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या वर्षी विधानसभेत सपाटून मार खाल्ल्यानंतर राज आणि उद्धव ठाकरे या सख्ख्या चुलत बंधूंनी एका छताखाली यावे, असे प्रयत्न दोन्ही पक्षांच्या काही पदाधिकाऱ्यांकडून सुरू होते. मात्र, अखेर हिंदी विरोधाच्या निमित्ताने तो मुद्दा मिळाला. इयत्ता पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा ऐच्छिक म्हणूनही शिकवता कामा नये अशी भूमिका या भावंडांनी घेतली आणि २० वर्षांनंतर हे दोघे ५ जुलै मोर्चा काढणार आहेत.

#### नेते चर्चा करतील...

दुसरीकडे संजय राऊत यांनी या विषयी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला टोलवले आहे. हुतात्मा चौकातून मोर्चा काढावा, असे उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ठरले होते. मात्र त्यासोबतच गिरगाव चौपाटी येथून मोर्चाला सुरुवात करावी, असा देखील पर्याय आमच्या बैठकीत चर्चेला होता, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. वेळ आणि सर्वांना सोयीचा मार्ग, या संदर्भात बैठकीत बसून नेते चर्चा करतील, असे देखील संजय राऊत यांनी सांगितले आहे.

आधी राज ठाकरे ५ जुलैला तर उद्धव ठाकरे ७ जुलैला मोर्चा काढणार होते. मात्र, बदलती राजकीय समीकरणे लक्षात घेऊन उद्धव यांनी उद्धवसेनेचा ७ जुलैचा मोर्चा रद्द करून ५ जुलैच्या राज ठाकरे यांच्या मोर्चात सहभागी होण्याचे ठरवले. अपेक्षेनुसार शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचे स्वागत केले, त्यानुसार ते देखील या मोर्चात सहभागी होण्याची शक्यता आहे.

## मोर्चात अजित पवार गट सहभागी होणार नाही

### प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंची स्पष्टोक्ती



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८ :** हिंदी सक्तीच्या विरोधात ठाकरे बंधूंच्या वतीने ५ जुलै रोजी मुंबई भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोचार्ला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने पाठिंबा दिला असून, मोर्चात सहभागी होणार आहेत.

या मोर्चाला राष्ट्रवादी अजित पवार गट पाठिंबा देणार का? पक्षाची नेमकी भूमिका काय आहे? याबाबत राजकीय वतुर्ळात उत्सुकता होती. यावर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली असून, या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यात पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधक हिंदी सक्तीला विरोध करत असून, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावी. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे, अशी स्पष्ट भूमिका मांडली होती. त्यामुळे ५ जुलैच्या मोर्चात अजित पवारांचा पक्ष देखील सहभागी होणार का? अशी चर्चा सुरू झाली होती. त्यावर आता सुनील तटकरे यांनी स्पष्ट विधान केले आहे.

**नेमके काय म्हणाले सुनील तटकरे?**

५ जुलैच्या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नाही, असे सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. हा विरोधकांचा मोर्चा आहे. त्यामुळे आमच्या पक्षाला जर या विषयावर काही मांडायचे असेल, तर आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून तो मार्ग शोधू, असेही ते म्हणालेत.

**आम्ही हस्तक्षेप करणार नाही**

शरद पवार यांच्या पक्षाने या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. याबाबत सुनील तटकरे यांना विचारले असता, मला याबाबत काहीच बोलण्याचे कारण नाही, राज्यातल्या निवडणुका महायुती म्हणूनच लढण्याचे ठरले आहे. असे असताना जर का कोणाला काही वेगळा निर्णय घ्यायचा असेल तर ते स्वतंत्र आहेत, त्यामुळे आम्ही त्याच्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही. आम्हाला ज्या पद्धतीने निवडणुकीला सामोरे जायचं आहे, त्या पद्धतीने आम्ही सामोरे जाऊ, असे त्यांनी म्हटले.

**राजकीय समीकरणे बदलणार नाहीत**

५ जुलैच्या मोचार्मुळे मराठी मतांचे ध्रुवीकरण होऊन महायुतीला फटका बसेल का? असा प्रश्न विचारला असता तटकरे म्हणाले, मी या मोर्चाकडे राजकीय चष्म्यातून बघत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, या मोर्चामुळे राजकीय समीकरणे फारशी बदलणार नाहीत, असे मला वाटते, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले.

## टेक्नोसॅव्ही भोंदूबाबाला अटक

### मोबाइलमध्ये हिडन ॲप टाकून पाहायचा भक्तांचे खासगी क्षण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २८ :** हिडन मोबाईल ॲपद्वारे भक्तांच्या खासगी क्षणांवर नजर ठेवत त्यांचा मानसिक छळ करणाऱ्या एका टेक्नोसेव्ही भोंदूबाबाला बावधन पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. प्रसाद उर्फ दादा भीमराव तामदार (२९) असे त्याचे नाव आहे. तो आपल्याकडे दिव्यशक्ती असल्याचा दावा करत भाविकांची फसवणूक करत होता.

सदर भोंदूबाबा बावधन परिसरात श्रद्धा व अंधश्रद्धेच्या आडून आपली दुकानदारी चालवत होता. आपल्याला दिव्यशक्तीची आत्मभूती प्राप्त झाली आहे, असा दावा करत तो भक्तांना तुमचा मृत्यू ४-५ महिन्यांत अटळ आहे असे भाकीत सांगून मानसिकदृष्ट्या कमकुवत करत होता. त

यानंतर मंत्रजाप करण्याच्या बहाण्याने तो भक्तांना एकांतात बसवून त्यांचा मोबाईल हातात घेत असे. नंतर पासवर्ड विचारून मोबाइलमध्ये गुपचूप एक हिडन ॲप डाऊनलोड करून ठेवत असे. हे ॲप मोबाईलमध्ये बॅकग्राऊंडमध्ये कार्यरत राहून बाबाला भक्ताचा कॅमेरा, आवाज, लोकेशन यावर नियंत्रण मिळवून देत असे.

यासंबंधी एका ३९ वर्षीय व्यक्तीने बावधन पोलिसांत तक्रार दाखल केली. भोंदूबाबाने आपल्याकडे दिव्यशक्ती असल्याचा भास निर्माण करत त्याला अनेक गोष्टी करण्यास भाग पाडले. फिर्यादी व त्याच्या जवळच्या सहकाऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील घटनांवर नजर ठेवली. एवढेच नाही तर फिर्यादीला अश्लील कृत्य व वेश्यागमन करण्यासही भाग पाडले.

त्याच्या तक्रारीनुसार पोलिसांनी तपास केला असता सदर भोंदूबाबाने त्याच्यासारखीच अनेकांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. अखेर या बाबाला बेड्या ठोकण्यात आल्या.

## ठाकरेंच्या मोर्चावर भाजपचे वेट ॲन्ड वॉच

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर मराठी-हिंदी वाद पुन्हा एकदा गाजत असताना, ठाकरे बंधूंच्या एकत्रित मोर्चावर भाजपने वेट ॲन्ड वॉचह्णची भूमिका घेतली आहे. उबाठा आणि मनसे एकत्र आल्याने निर्माण झालेल्या राजकीय घडामोडींवर भाजपकडून सध्या सावध पवित्रा ठेवण्यात येत आहे.

मराठीच्या अस्मितेवरून रंगलेल्या राजकारणाला भाजपकडून अभिजात दर्जाचे उत्तर दिलं जाणार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच झाल्याचं ठसठशीतपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याची रणनीती आखली जात आहे. भाजपच्या नेत्यांचा दावा आहे की, मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने भाषा संवर्धनासाठी मोठा फायदा होणार आहे. त्या अंतर्गत अभ्यास, संशोधन, नवीन केंद्रे, साहित्य प्रकल्प यांना चालना देण्याचा प्रयत्न होणार आहे.

## विलास शिंदेंची हकालपट्टी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** राजकारणातील नाराजीचं रूपांतर थेट पक्षांतरात होताना पुन्हा एकदा दिसत आहे. विलास शिंदे यांची उबाठा पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून, त्यांनी आपल्या समर्थकांमध्ये नाराजी व्यक्त करत लवकरच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

विलास शिंदे हे उबाठातील महत्वाचे नेते मानले जात होते. मात्र, पक्षातील वाढत्या दुर्लक्षामुळे ते अस्वस्थ होते. त्यांच्या जागी मामा राजवाडे यांची नाशिक महानगर प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती करताना उबाठा नेतृत्वाने कार्यकर्त्यांना संघटनेच्या एकसंघतेचे आवाहन केले. दरम्यान, शिंदे गटातील नेत्यांशी शिंदे यांचे चचेर्चे वृत्त पुढे येत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही हालचाल महत्त्वाची मानली जात आहे. विलास शिंदे यांचा शिंदे गटात प्रवेश झाल्यास नाशिकमधील समीकरणे बदलू शकतात.

## अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचा हिंदी सक्तीला विरोध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** त्रिभाषा सूत्रातील हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी एकत्र येत थेट रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ५ जुलै रोजी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान दरम्यान विराट मोर्चा काढण्यात येणार आहे.

या आंदोलनाला आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा पाठिंबा मिळाला असून, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी साहित्यिक, सांस्कृतिक कार्यकर्ते, अभ्यासक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. तर मराठवाडा साहित्य परिषदेनेही या धोरणाला विरोध केला. मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांनी मराठीवर घाला घालू देणार नसल्याचा इशारा दिला.

राज्य सरकारने केंद्र सरकारला खूश करण्यासाठी आणि दक्षिण भागात आपले पाय पसरण्यासाठी पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा घाट घातला आहे.

सरकारच्या या कारस्थानाविरुद्ध मराठी माणसांनी एल्गार न केल्यास राज्यात कुणालाच अभिमानाने मी मराठी म्हणता येणार नाही, असे मत मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी काढले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीविरोधातील हिंदी सक्तीचा सूर बैठकीत उमटला.

पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. दादा गोरे, डॉ. चंद्रदेव कवडे यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी कुठल्याही परिस्थितीत मसाप मराठीवर घाला घालू देणार नसल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

**मराठी स्वाभिमानासाठी एकत्र येणे स्वागतार्ह– सतेज पाटील**

दुसरीकडे काँग्रेस नेत्यांनी देखील या मोर्चाबद्दल सकारात्मक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रात सक्तीची हिंदी लादली जात असल्याचा आरोप होत असताना, मराठी भाषेच्या रक्षणासाठी आता एक महत्त्वाचा मोर्चा एकजूटीनं निघण्याची घोषणा करण्यात आली आहे.

उबाठा आणि मनसे एकत्र येऊन मोर्चा काढणार असल्याचं स्पष्ट होताच, राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील तसेच विजय वडेट्टीवार यांनी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर संभाजीनगरात

### उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्यासाठी प्रयत्न : प्रताप सरनाईक



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुनश्च वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये होणाऱ्या या सेंटरच्या माध्यमातून उत्पन्नाचा वेगळा व शाश्वत स्त्रोत भविष्यात एसटीला निर्माण होईल! असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. ते २७ जून रोजी या संदर्भात बोलावलेल्या एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते.

या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते. केंद्र शासनाद्वारे सन.२०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी (फ्श्रत्र) नावाने १५ वर्षापेक्षा जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्यांच्या सुट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले.

सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रि स्टॅंडर्ड (अक्र) च्या अटी शतीर्नुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे.

त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक- खासगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

**एसटीला उत्पन्न मिळवून देणारा नवा स्त्रोत**

मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या शासनाच्या परवानगी ने राज्यात ८ संस्था स्क्रॅपिंग केंद्र चालवत असून त्यांची वषार्ला किमान १००० वाहने स्क्रॅप करण्याची क्षमता आहे.

अशा संस्थांना शासनाच्या वतीने परवानगी देणारे परिवहन खाते हे देखील माझ्या अखत्यारीत असल्यामुळे एसटीचा अध्यक्ष आणि परिवहन मंत्री या नात्याने या प्रकल्पाला गती देऊन भविष्यात सर्वाधिक वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे सेंटर एसटीच्या माध्यमातून उभारले जाणार असून एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत यातून निर्माण होईल, असा विश्वास आहे.

या आढावा बैठकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची करार पद्धतीने भरती करणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बदल्या व बढत्यांचे निकष ठरवून ते अमलात आणणे, नवे वाहन खरेदी धोरण इत्यादी विषयावर चर्चा झाली.

## शिक्षण, समर्पण आणि विदर्भवादाची कणखर शिदोरी

### एक दुर्मीळ प्रेरणादायी योगायोग

प्रा. डॉ. प्रशांत विघे
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
९३२६८७७७४९



शिक्षण हे जीवनाचा मूलाधार आहे, हे आपण वारंवार ऐकतो. पण जेव्हा शिक्षणात एकाच कुटुंबातील दोन पिढ्या एकाच मंचावर पदवीधारक म्हणून उभ्या राहतात, तेव्हा ती घटना केवळ वैयक्तिक यशापुरती मर्यादित राहत नाही, तर ती समाजासाठी प्रेरणादायी ठरते.

अशाच दुर्मीळ, भावनिक आणि प्रेरणादायी क्षणाचा साक्षीदार ठरला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन व अध्ययन केंद्राचा २५ जून २०२५ रोजीचा दीक्षांत समारंभ.

या दीक्षांत सोहळ्यात विदर्भ राज्य आंदोलन समिती व जय विदर्भ पार्टीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत आणि त्यांची कन्या शिवानी राजपूत यांना एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी या विषयातील पदवी एकाच मंचावर प्रदान करण्यात आली. ही केवळ एक शैक्षणिक घटना नसून, संघर्ष, समर्पण आणि ज्ञानप्रेम यांचा संगम असलेला एक आदर्श प्रसंग होता.

**शिकण्यास वयाचं बंधन नाही**

शिकण्यास वयाचं बंधन नसतं, हे विधान केवळ सुभाषित न राहता प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत यांच्या जीवनात साकार झालेलं वास्तव आहे. प्राचार्यपदावरून निवृत्त झाल्यानंतर, वयाच्या ६५व्या वर्षी त्यांनी एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी या आधुनिक व भावनिक समजुतीच्या विषयात पदवी प्राप्त करून घेतली. ही बाब त्यांच्या निरंतर शिकण्याच्या ओढीचे, भविष्याचा वेध घेणाऱ्या दृष्टिकोनाचे आणि वैचारिक जागृतीचे प्रतीक आहे.

या वयानंतर बहुतेक जण विश्रांतीचा विचार करतात, पण डॉ. राजपूत यांनी निवृत्तीनंतरही नवनवीन ज्ञान मिळवण्याचा ध्यास सोडला नाही. समाजातील मानसिक आरोग्याच्या प्रश्नांवर कार्य करण्याची संवेदनशीलता, आणि त्या दिशेने शिक्षण घेण्याची सक्रियता सोडली नाही.

यामुळे ते केवळ एक शिक्षक किंवा नेते न राहता, तर नव्या युगाचा दिशादर्शक विचारवंत ठरतात. त्यांच्या या वाटचालीतून हे स्पष्ट होते की, भविष्याचा वेध घेण्यासाठी वय नव्हे, तर विचारांची तयारी आवश्यक असते. ही तयारीच त्यांना सामान्यांपेक्षा वेगळं आणि प्रेरणादायी ठरवते.

प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत हे विदर्भ राज्याच्या स्वबळावरच्या लढ्याचे एक खंदे नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. तरीही त्यांनी शिकण्याची ओढ जपली. एम.ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपीसारख्या मनोविज्ञानाशी संबंधित संवेदनशील विषयाचा अभ्यास पूर्ण केला. त्यांच्याच प्रेरणेतून त्यांची कन्या शिवानी राजपूत हिने देखील हेच शिक्षण पूर्ण करून पित्याच्या विचारांचा वारसा आत्मसात केला.

आज ज्या समाजात पिढ्यांमध्ये अंतर वाढत चालले आहे, तिथे एकत्र शिकणाऱ्या बाप-लेकीचा हा प्रसंग पिढ्यांमध्ये समन्वय आणि सहप्रवासाचा आदर्श ठरतो.

**विदर्भवादाचे शिस्तबद्ध नेतृत्व आणि सुसंस्कारित वारसा**

डॉ. पी. आर. राजपूत हे विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या माध्यमातून विदर्भाच्या हक्कासाठी सातत्याने लढणारे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वात विदर्भवादाला जी वैचारिक धार प्राप्त झाली, ती शिक्षणाच्या माध्यमातून अधिक संवेदनशील होत चालली आहे. शिवानी राजपूत हिच्या शिक्षणामधून ही विचारधारा पुढे नेली जात आहे, याचे विशेष समाधान वाटते.

या प्रसंगी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा सौ. रंजनाताई मामर्डे यांनी या बाप-लेकीच्या यशाबद्दल विशेष अभिनंदन करत, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या कौतुकाने महिलांच्या नेतृत्व विकासाच्या क्षेत्रातही एक सकारात्मक संदेश गेला आहे.

एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी ही पदवी केवळ शिक्षणात गूढतेची भर घालणारी नाही, तर समाजाच्या मानसिक आरोग्याच्या समस्यांवर उपचार करणारी आणि भावनिक समृद्धी घडवणारी ठरते. अशा विषयात अभ्यास करून बाप-लेकीने समाजसेवेचा नवीन अध्याय सुरू केला आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाची कहाणी नाही, तर ती संपूर्ण विदर्भासाठी एक सशक्त प्रेरणा आहे,की शिकण्याची सीमा नसते, वयाचं बंधन नसतं, आणि कधीही नव्या अध्यायाची सुरुवात करता येते. या यशस्वी आणि प्रेरणादायी बाप-लेकीला शुभेच्छा!

शेवटी एवढाच सांगता येईल की, माजी प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत हे विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षक आणि सामाजिक समर्पणाचे प्रतीक आहेत. शिक्षण, समाज आणि आंदोलन या तीनही क्षेत्रात त्यांचे योगदान हे प्रेरणादायी आहे. त्यांच्या कायार्तून अनेकांना प्रेरणा मिळत असून, विदर्भाच्या तरुणांमध्ये भविष्यकाळात त्यांच्या विचारांचा प्रभाव निश्चितच राहील हे मात्र खरं !

■ ■ ■

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com RNI No.: MAHAMAR/2016/79101